मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक ४ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • एप्रिल - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

अंक ४ ● वर्ष १९ वे ● पृष्ठे ५२ ● एप्रिल २०१८

संपादक
**राजेंद्र थोरात**

सहसंपादक
**सुरेश तिर्लोटकर**


सजावट व चित्रे
**उदय सत्यवान पांगे** **राजनंदन पिंपळकर**

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## कथा

○ रावणाला शाप ०६
○ खरी दौलत ०८
○ शिंपल्या आणि माणूस १४
○ मी भिकारी नाही २२
○ जाळ्यातून सुटका ४२



## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- अनंत कान्हेरे ०५
- तेजस्विनी -७२ २०
- दुर्गभ्रमंती २१
- ऑटिझमपासून सावधानता २९
- समर्थ दर्शन -४२ ३४
- बाबा गुरबचनसिंहजींचा... ३५
- आपले जिल्हे ४४
- पक्षीजगत ४७
- महात्मा जोतीराव फुले ४८





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- पहाट झाली ३१
- जागतिक वसुंधरा दिन ४५

# संस्कारक्षम वातावरण

त्या दिवशी पुण्यातल्या एका अत्याधुनिक सुसज्ज रुग्णालयाचं उद्‌घाटन होतं. रुग्णालयाचं नाव दीनानाथ मंगेशकर रुग्णालय - लता मंगेशकर यांनी आपल्या वडिलांच्या स्मृत्यर्थ मोठ्या जिद्दीने ते उभारलं होतं. त्याचं उद्‌घाटन होतं. लता मंगेशकर यांच्या आयुष्यातील हा एक अतीव समाधानाचा, कर्तव्यपूर्तीचा क्षण होता, दीनानाथांनी अंतसमयी लताला जवळ बोलावून तिच्या हातात एक जीर्ण वही ठेवली. या वहित दुर्मिळ चीजा, काही नोटेशन्स होती. जणू लताची भगवद्‌गीताच! यशस्वी हो अशा आशीर्वाद देऊन दीनानाथांनी जगाचा निरोप घेतला. त्याचक्षणी किशोरवयीन लताचं बाल्य संपलं. चार भावंडांची जबाबदारी पेलणारी एक समंजस, जबाबदार व्यक्ती म्हणून जणू तिचा जन्म झाला. त्यानंतर पराकोटीच्या प्रतिकूल परिस्थितीशी ती झगडत राहिली. कष्ट, मेहनत, जिद्द आणि विलक्षण मधुर आवाज, अप्रतिम प्रतिभाशक्ति यांच्या जोरावर लताने डोळे दिपून जातील एवढं वैभव, अफाट कीर्ती अन् अमर्याद लोकप्रियता मिळविली.

उतारवयातही विशीतल्या अभिनेत्रीसारख्या पार्श्वगायन करणाऱ्या लता मंगेशकर यांनी स्वत:मधील संवेदनशीलता फुलातील सुगंधासारखी जपली. म्हणूनच पितृऋणातून अंशत: का होईना मुक्त होण्यासाठी त्यांनी गोरगरिबांच्या सेवेसाठी सदैव सुसज्ज असं एक अद्ययावत रुग्णालय पुण्यात बांधलं! त्या दिवशी रुग्णालयाचं उद्‌घाटन होतं. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी उद्‌घाटन समारंभाला नवी दिल्लीतून आले होते. उद्‌घाटन समारंभ झाला. लता मंगेशकर आपल्या भाषणात म्हणाल्या, अनेक जण मला विचारतात, की तुमच्या घराण्यात सर्वच जण अति उत्तम गायक कसे काय आहेत? उत्तर सोपं आहे, ते म्हणजे वातावरण. इथं उपस्थित असलेल्या माता भगिनींपैकी कोणाचंही मूल जर आमच्या घरात जन्माला आलं असतं, तरी ते सुध्दा उत्तम गायकच झालं असतं. कारण आमच्या घरातील वातावरणच मुळी चोवीस तास संगीताला पोषक असतं!

हा प्रसंग ठेवण्याचा हेतू हाच आहे, की इथं एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की मुलानं उत्तम शिकावे असं जर वाटत असेल, तर घरातलं वातावरण मुलाच्या शिक्षणाला योग्य असलं पाहिजे. खाजगी क्लास, गाईडस्, नोटस्, सर्वोत्तम शाळा एवढंच देऊन मूल शिकत नसतं, खरी गरज असते ती संस्कारक्षम वातावरणाची. आज हे वातावरण निरंकारी मिशनचे साहित्य, बालसत्संग, किडस्-डिव्हाइनसारख्या वेबसाइट यांच्या माध्यमातून घराघरात निर्माण होत आहे.

- राजेंद्र थोरात

# अनंत कान्हेरे



इंग्रजांच्या काळात जिल्ह्याचा कलेक्टर म्हणजे जणू त्या जिल्ह्याचा राजाच असे. ऑर्थर मॅसन टिपेटस जॅक्सन हा भारतातला अतिशय मग्रूर असा मुलकी अधिकारी होता. त्याने नाशिकमधील स्वातंत्र्यप्रेमी युवकांची चळवळ मुळातूनच उखडून टाकण्याची प्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणे तो वागतही होता. अनंत लक्ष्मण कान्हेरे नावाच्या युवकाने जो अवघ्या १८ वर्षांचा होता त्यानं ठरवलं, की आता आपणच जॅक्सनला उडवायचं! हा अनंत कान्हेरे मूळचा कोकणातला. केसरी, काळ ही वृत्तपत्र तो नियमित वाचीत असे. तो संधीच्या शोधातच होता. त्याला तशी संधी मिळाली. २१ डिसेंबर १९०९ या दिवशी स्वत: जॅक्सन आपल्या परिवारासह किर्लोस्कर नाटक कंपनीचे शारदा हे नाटक पाहण्यासाठी येणार होता. बालगंधर्व शारदेची भूमिका करणार होते. पण अनंत काण्हेरे एक वेगळीच भूमिका करणार होता. क्रांतिकारकाची भूमिका. या भूमिकेतून तो जॅक्सनला केवळ नाशिकमधूनच नव्हे; तर या भूतलावरुन कायमचा निरोप देणार होता. अनंत आठ वाजताच नाट्यगृहात पोचला. बरोबर होते भरलेले पिस्तुल. नाटक वेळेवर सुरु झाले. पण जॅक्सन आला नाही. अनंतची नजर नाट्यगृहाच्या दरवाजावर होती. जॅक्सनची गाडी आली. तो उतरला आणि नाट्यगृहाच्या पहिल्या रांगेतील राखून ठेवलेल्या खुर्चीकडे निघाला. आता तो खुर्चीवर बसणार, तोच अनंत कान्हेरे उठला. ताड ताड चालत त्याने जॅक्सनला समोरच गाठले. पिस्तुल काढले अन् प्रेक्षागारातील सर्व प्रेक्षकांच्या समोर आमने सामने, धडाधड चार गोळ्या जॅक्सनच्या छातीत झाडल्या. रक्तबंबाळ झालेला जॅक्सन खाली कोसळला, तो कायमचा! अनंत कान्हेरे पळून गेला नाही. त्याने स्वत:ला अटक करुन घेतली. त्याच्यावर खटला चालवला गेला अन् १९ एप्रिल १९१० ला म्हणजे जॅक्सनच्या वधानंतर चारच महिन्यांनी ठाणे कारागृहात त्याला फाशी देण्यात आले.

अनंत कान्हेरेचा जन्म सन १८९२ मध्ये मध्य प्रदेशातील इंदोर या शहरातला. त्यांचे प्रारंभिक शिक्षण इंदोरला झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी तो आपल्या मामाच्या गावी औरंगाबादला गेला. त्याचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील होते. टिळकांच्या प्रभावी भाषणाचा आणि अग्रलेखांचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला होता.

# रावणाला शाप

रावण पृथ्वीभ्रमण करीत असताना त्याने पाहिले, की राजा मरुत्त देवांबरोबर बसून यज्ञ करीत आहे. ब्रह्मदेवाच्या वरदानाने अजिंक्य व अमर ठरलेल्या रावणाने त्या यज्ञभूमीवर प्रवेश करताच देव घाबरले व त्यांनी तीर्थकयोनीत प्रवेश केला. इंद्र मोर, धर्मराज कावळा, कुबेर कृकल (एक पक्षी) आणि वरुण हंस झाला. गर्विष्ठ रावणाने आपला परिचरय करुन देत राजा मरुत्ताला युध्दाचे आव्हान दिले. मरुत्ताने ते स्वीकारले व धनुष्याची प्रत्यंचा खेचीत रावणाला युध्दाचे प्रति आव्हान दिले, परंतु यज्ञ करीत असलेले ऋषी, राजा मरुत्ताला स्नेहपूर्वक म्हणाले, राजा आपण आताच कोठे माहेश्वर यज्ञास आरंभ केला आहे. जर हा यज्ञ पूर्ण झाला नाही, तर तुझे समस्त कुल तो दग्ध करील. यशाची दीक्षा घेऊन बसलेल्या पुरुषाच्या ठायी, युध्द, क्रोध अशा गोष्टींना स्थान नाही. हे ऐकल्यावर मरुत्त युध्दापासून परावृत्त झाला. त्याने धनुष्य खाली ठेवले.

रावणाला मात्र वाटले, की आपला हा विजयच झाला. यज्ञासाठी बसलेल्या महर्षींचा त्याने क्रूरपणे वध केला व आपल्यासोबतच्या राक्षससैनिकांना त्या तुकडे केलेल्या महर्षींना खाऊन टाकण्यास सांगितले. एकदाचा रावण त्या यज्ञभूमीवरुन निघून गेला आणि देव मूळरुपात प्रकटले.

सर्वात प्रथम इंद्र हर्षपूर्वक निळ्या पंखाच्या मोराला म्हणाला, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला सापाचं भय राहणार नाही. माझ्यासारखेच सहस्त्रनेत्र तुझ्या पंखावर प्रकट होतील. मी मेघरुप होऊन पाऊस पाडीन, तेव्हा तुला मोठा आनंद होईल. तुझा पिसारा केवळ एकरंगी निळा राहणार नाही, तर यापुढे तो इंद्रधनुष्यासारखा मोहक व अनेकरंगी होईल!

छतावर बसलेल्या कावळ्याला धर्मराज प्रसन्नतापूर्वक म्हणाले, कोणताही रोग तुला पीडा देऊ शकणार नाही. तुला मृत्यूचं भय राहणार नाही. भूतलावर तुला पिंडदान केल्याने स्वर्गात मृत पितरांना तृप्ती व मुक्ती लाभेल! गंगेच्या जलात पोहणाऱ्या हंसाला वरुणाने म्हटले, चंद्रमंडळ व शुभ्र फेसासारखा तुझा फेनिल धवल रंग म्हणजे वरुणदेवतेच्या प्रेमाचे प्रतीक ठरेल. तसेच जलात आश्रय घेऊनही तू सदैव कांतिमान राहशील. कुबेराने पर्वतशिखरावर बसलेल्या कृकलास म्हटले, सुंदर सुवर्ण वर्णाची व रंगाची देणगी मी तुला देतो.

अशाप्रकारे पक्ष्यांना उत्तम वर देऊन यशोत्सव समाप्त झाल्यावर सर्व देव राजा

मरुत्तासह पुन्हा स्वर्गलोकी निघून गेले. सर्वांना युध्दाचे आव्हान देत व आपल्या बलाढ्यतेची प्रौढी मिरवीत फिरणारा रावण मग अयोध्यापुरीत आला. तेथे इक्ष्वाकु वंशातील राजा अन्यरण राज्य करीत होता. अन्यरणाने रावणाचे युध्दाचे आव्हान स्वीकारले. आपल्या मोठ्या सैन्यासह अन्यरण रावणावर तुटून पडला. त्यामुळे रावणाच्या सैन्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तरी प्रत्यक्ष वरदान लाभलेल्या रावणाचे फार नुकसान झाले नाही. शेवटी गदेचा प्रहार करुन रावणाने अन्यरणाला गारद केले व तो भूमीवर घायाळ तडफडत पडला असताना, रावण त्याच्याकडे पाहून विकट व कुत्सितपणे हसू लागला. तेव्हा मृत्यूचे शेवटचे क्षण मोजणाऱ्या अन्यरणाने रावणाला शाप देत म्हटले, "निशाचरा, मला हाच आनंद वाटतो, की तुला साक्षात ब्रह्माचे वरदान लाभलेले असूनदेखील मी तुझे युध्दाचे आव्हान स्वीकारले व युध्द करताना रणभूमीवर तुझ्या हातून मारला गेलो; परंतु वेडेवाकडे उद्गार काढून व कुत्सितपणे हसून तू जो इक्ष्वाकुवंशाचा अपमान केलास, त्याबद्दल मी तुला शाप देत आहे. याच माझ्या वंशात दशरथनंदन श्रीराम प्रकट होतील व ते तुझा संपूर्ण नि:पात करतील." यावर आकाशातून पुष्पवृष्टी झाली. देवदुंभी वाजू लागली व राजा अन्यरण स्वर्गलोकी गेला.

❍ क्रमशः

## रॉबर्ट गोडार्ड : मास्टर माइंड

वोर्सेस्टर येथील पॉलिटेक्निकमध्ये शिकत असलेला तो एक बावीस वर्षे वयाचा तरुण होता. अंतराळ संचाराची या तरुणास फार ओढ होती आणि म्हणूनच या संचारासाठी आवश्यक असलेल्या अग्निबाणासारख्या साधनांनी त्याचे लक्ष वेधून घेतले होते. अंतराळशास्त्राबद्दल त्याने खूपसे वाचन केले होते. आपले अंतराळशास्त्रातील ज्ञान व कल्पना जनतेच्या नजरेस याव्यात त्या उद्देशाने त्याने अंतराळ संचारविषयक काही तांत्रिक लेख तयार केले आणि मग ते ख्यातनाम वृत्तपत्रांकडे प्रसिध्दीस पाठविले. आपल्या या लेखांची, लेखांच्या प्रसिध्दीची आतुरतेने वाट पाहत असतानाच एक दिवस ते सारे लेख टपालाने साभार परत आले. लेखपरतीचे कारण देताना संपादकांनी म्हटले होते, की आपल्या लेखात मांडलेली अवकाश संचाराची कल्पना व इतर ग्रहांचा प्रवास या गोष्टी स्वप्नवत वाटतात. एवढेच नव्हे, तर त्या असंभाव्यदेखील आहेत, असे आम्हाला वाटते. त्यामुळे वाचकांना नसत्या स्वप्नरंजनात गुंगवणे आम्हाला पटत नसल्याने लेख परत पाठवीत आहोत.

संपादकाचे पत्र वाचताच तो कल्पक तरुण सुरुवातीस अगदी नाऊमेद झाला, परंतु एक दिवस संपादकाला वाटणारे हे स्वप्न मी सत्यसृष्टीत अवतरुन दाखवीन या आत्मविश्वासाने त्याने आपले प्रयोग चालूच ठेवले आणि काही वर्षांच्या कालावधीनंतर असा दिवस आला, की या विषयावर लेखन करण्यासाठी त्याच वृत्तपत्रांनी त्या तरुणास विनंती केली. कोण होता या अंतराळसफरीचे स्वप्न उराशी बाळगणारा तरुण? रॉबर्ट गोडार्ड हे त्याचे नाव. आज अग्निबाणशास्त्रात या नावाला फार मोठी किंमत आहे. या गोडार्डच्या अग्निबाणामुळेच आज अंतराळ याने अवकाश सफरीस पाठविणे शक्य झाले आहे.

❏❏❏



कथा

# खरी दौलत

एक लहानसे गाव होते. त्या गावात गोपाळ नावाचा एक गृहस्थ राहत होता. त्याला एक पत्नी आणि एक मुलगा होता. गोपाळ हा गावात लोकांची मजुरी करुन कसातरी उदर-निर्वाह करायचा. पुढे तो अचानक आलेल्या आजाराने मरण पावला. त्याचा मुलगा माधव आणि त्याची पत्नी यांना कोणाचाच आधार उरला नव्हता. त्यात माधवची आईसुध्दा आजारीच असायची. माधव त्यावेळी दहा वर्षांचा होता. तो कोणाकडे जाऊन एखादे कामही करु शकत नव्हता. बिचारा लाचार होऊन कोणाकडून काहीतरी मागून आणून आईला देत असे.

काही दिवसांनी आई जास्तच आजारी झाली. मग त्याने आईला सरकारी दवाखान्यात नेले. डॉक्टरने निदान करुन औषध-गोळ्या दिल्या. माधव आईला घेऊन घरी आला.



डॉक्टरांनी सांगितले होते, की गोळ्या आणि औषध रिकामे पोटी घेऊ नका. माधवला आता काय करावे हेच काही सुचत नव्हते.

विचार करत करत तो वाटेने चालत राहिला. आपण कुठे जातो व का जातो ? याचे त्याला काहीच भान राहिले नव्हते. चालता-चालता एका लहानशा बागेजवळ आला. थोडं मन हलकं झालं. त्या बागेतच एक बंगला होता. बंगल्याच्या दरवाजात जाऊन उभा राहिला आणि माई म्हणून प्रेमळ आवाजात हाक मारली. आतून लगेच राधा बाहेर आली. माधव तिला हात जोडून नम्रपणे म्हणाला, माई मी तुमची ही बाग साफ करुन देऊ का ? त्यावर राधा म्हणाली, नको-नको त्याची काही गरज नाही. आम्ही ती करु साफ.

त्यावर माधव म्हणाला, माई करुन घ्याना साफ. मी चांगली स्वच्छ करीन.

त्याच्यावर दया येऊन राधाबाई म्हणाल्या, किती पैसे घेणार ?

माधव म्हणाला, माई मला पैसे नकोत, जेवण द्या.

राधा म्हणाली, ठीक आहे- कर साफ. बिचारा फार भुकेला दिसतो आहे. (राधा तोंडातल्या तोंडात पुटपुटली.)

राधा म्हणाली, आधी जेवण करुन घे. नंतर काम कर.

त्यावर माधव म्हणाला, नाही माई ! मी आधी काम करतो. नंतर मला जेवण द्या.

उर्वरित पान क्र. १५ वर

# शब्दकोडे

# १६५

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ■ | ४ |
| | ■ | ५ | | | | |
| ६ | | | ■ | | ■ | १० |
| | ■ | | ■ | ■ | ७ | ■ |
| ■ | ८ | | ९ | | | |
| ■ | | ■ | | ■ | | ■ |
| १० | | ११ | | ■ | १२ | |
| | ■ | | ■ | १३ | | ■ |

## आडवे शब्द

१. निरंकारी मिशनमध्ये मानव ...... दिवस एप्रिल महिन्याच्या चोवीस तारखेला साजरा करतात.

५. महाभारताचे जुने नाव काय आहे ?

६. असक्षम या शब्दाचा विरुध्दार्थी

८. भारताचे दुसरे पंतप्रधान ........ शास्त्री होते.

१०. हनुमंताला अमरत्वाचे ......... होते.

१२. महात्मा गांधींना .......... या नावाने हाक मारत.

१३. भारतातील सगळ्यात मोठे वाळवंट

## उभे शब्द

१. सप्टेंबर आणि डिसेंबर महिन्यातील दिवसांची बेरीज

२. यमुना नदी किनारी असलेली प्रसिध्द कबर

३. एका रसाळ फळाचे नाव

४. कोणत्या देशाची राजधानी थिम्पू आहे ?

७. महाराष्ट्रातील एक आदिवासी जिल्हा

८. औसा, निलंगा, चाकूर, देवणी ही गावे .......... या जिल्ह्यात आहेत.

९. जर्मनीची राजधानी

१०. छत्रपती संभाजी महाराजांचा वध पुणे जिल्ह्यातील या ठिकाणी करण्यात आला होता.

११. सेवक, नोकर

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : मनाचे विकार कशामुळे दूर होतील ?**

**उत्तर :** मनाच्या सर्व व्याधी आणि विकार ब्रह्मज्ञानामुळेच दूर होऊ शकतील. कारण अहंकारामुळे मनात क्रोध, घृणा, तणाव, भेदभाव, कलह घर करुन राहतात. आत्मा-परमात्म्याची भेट न होणे हेच सर्व दु:खाचे मूळ आहे. ब्रह्मज्ञानामुळे मूळ स्वरुपाचे ज्ञान होऊन मनाचे भ्रम मिटतात. मनाचा विलय आत्म्यात होतो. मन शुध्द, पवित्र आणि निर्मळ बनते. निर्मळ मनात कुठलाही विकार उरत नाही.

**प्रश्न : धर्म याचा खरा अर्थ काय ?**

**उत्तर :** प्रभु-परमात्म्याला जाणणे हाच खरा धर्म आहे. परमात्मा हाच केवळ सत्य आहे. 'सत्यापरता नाही धर्म, सत्य हेचि पारब्रह्म' असे संतांनीही लिहून ठेवले आहे. म्हणजे परमात्मा हाच धर्म आहे. परमात्म्याला जसं कोणी निर्माण केलेलं नाही, परमात्मा स्वयंपूर्ण आहे. तसा धर्म स्वयंपूर्ण आहे. अनाम आहे. जेव्हा एखादा पूर्ण संत सत्याची उद्घोषणा करतो. त्यावेळी त्या-त्या विशिष्ट ठिकाणाशी किंवा समाजाशी त्याचा संदर्भ जोडला जातो आणि त्या समाजाच्या नावाने त्या सत्याला अमुक धर्म म्हणून लोक प्रसिध्दी देतात. वास्तविक धर्म आणि सत्य (परमात्मा) हे एकाच अर्थाचे दोन शब्द आहेत.

**प्रश्न : भक्ती का करावी ?**

**उत्तर :** भक्ती केली जात नाही. ईश्वराला जाणल्यावर आत्मा परमात्म्याचं मिलन होतं. अर्थात जिवाला आत्मस्वरुपाचा बोध होतो, की मी विशाल सत्तेपासून वेगळा नाही. त्यानंतरची अवस्था ही भक्ती आहे. परंतु कर्मकांड करणे, पूजा अर्चा, व्रत-उपवास यालाच भक्ती समजलं जातं किंवा भौतिक वस्तूंच्या प्राप्तीसाठी या गोष्टी कराव्या लागतात असा समज आहे. जीवनात भक्ती यावी ती मनुष्य जन्माचं सार्थक व्हावं यासाठी. जीवनमुक्ती हेच मनुष्य जन्माचं आद्य कर्तव्य आहे, ते सद्‌गुरुच्या कृपेने ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर संभव आहे. अर्थात इच्छा वासनांचा क्षय होण्यासाठी भक्ती आवश्यक आहे.

**प्रश्न : जीवनात येणाऱ्या कठीण प्रसंगावर मात करण्याचा उपाय कोणता ?**

**उत्तर :** प्रभु-परमात्म्याच्या अनुसंधानात राहणे (एकरुप होऊन राहणे) हा सर्व कठीण प्रसंगावर मात करण्याचा सहज सोपा उपाय आहे. परमात्म्याची अनुभूती किंवा जाणीव सतत राहिल्यास जीवनात सहजता येते.



# सद्गुरु वचनामृत

## संतांचं जीवन समर्पित भावनेचं व्हावं

साधसंगत, हे जे सत्संगाचे, समागमाचे कार्यक्रम होतात, भले कुठेही असोत, महापुरुषांचा मुख्य उद्देश केवळ हाच असतो, की आपण सारे एकत्र येऊन सेवा-सत्संग- स्मरण करावे. ब्रह्मज्ञानाची चर्चा करावी. बाबाजींची शिकवण, हे ब्रह्मज्ञान जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवावे, प्रत्येक माणसापर्यंत पोचवावे. साधसंगत, कुठेतरी एक वाक्य वाचायला मिळालं -

सब कुछ हो रहा है इस तरक्की के जमाने में।
पर क्या गजब की बात है,
आदमी इन्सान नही बनता।।

(या प्रगतीच्या जगात सारे काही (शक्य) होत आहे; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे माणूस हा

मानव बनू शकत नाही.)

जगाची परिस्थिती अशी झालेली आहे, की आता माणूस हा माणूस राहिलेला नाही. माणूस आणि मानव यांना एक समजलं जात नाही; कारण फक्त देह मानवाचा धारण करुन कोणी मानव होत नाही. आजकाल जेवढी भौतिक प्रगती होत आहे तेवढाच स्वार्थीपणा वाढत आहे. सारं काही स्वत:ला मिळावं असं माणसाला वाटतं. **Man has become a dangerous machine. Its like cannibal eating with a fork**
(मराठी अर्थ - माणूस एक धोकादायक यंत्र बनला आहे. भक्षकाप्रमाणे त्याचे वर्तन आहे.)

अशा काळात फक्त भौतिक प्रगतीच पुरेशी नाही, याबरोबरच आध्यात्मिक प्रगतीदेखील अत्यंत गरजेची आहे आणि ती जगात पसरविण्यासाठी, बाबाजींची शिकवण जगभर पसरवण्यासाठी आपण सारे महापुरुष कसोशीने प्रयत्न करत आहात.

साधसंगतजी, काही दिवसांपूर्वी दोन फुलदाण्या **(Flower Vase)** समोर पाहिल्या. एकावर लिहिलं होतं **Crystal Glass** आणि दुसरी सर्वसाधारण काचेची होती. परंतु दिसायला दोन्हीही सारख्याच दिसत होत्या. ज्यावेळी विचारणा केली तेव्हा सांगण्यात आलं, की जो क्रिस्टल ग्लास असतो त्यावर जर सूर्याची किरणं पडली तर पलीकडे एक सप्तरंगी इंद्रधनुची आभा तयार होते. त्याच्यावर कडेला जर ओल्या बोटाने स्पर्श करत बोट फिरवत गेले तर संगीतमय ध्वनी उमटतो. त्या भांड्याचा तळ फारच मुलायम असतो, टोचत नाही. असे हे दोन सारखे दिसणारे **Flower Vase** (फुलदाण्या) आपण जर हातात घेतले तर क्रिस्टलची फुलदाणी नक्कीच सरस ठरेल. त्याचवेळी मनात विचार येऊन गेला, की संत-महापुरुषदेखील दिसायला साधारण माणसांसारखेच दिसतात; पण त्यांचं हृदय मात्र कोमल असतं. ते कधी कुणाला दुखवत नाहीत. कुणाचं मन दुखवत नाहीत. समर्पित भावनेने या निरंकाराच्या इच्छेत राहतात. त्यांचा हा उद्देश असतो, की आपण सर्वांना प्रेम द्यावे, सर्वांना या बाबतीत समजवावे जेणेकरुन सारे प्रेम-नम्रतेने मिळून-मिसळून राहू शकतील.

संत समर्पित भावनेने जगत असतो. निरंकाराच्या इच्छेत जो जगतो, त्याचा हाच प्रयास असतो, की प्रत्येक महापुरुष समर्पित भावनेने आणि प्रभुइच्छेत जगावा.

निरंकाराकडे हीच प्रार्थना आहे, की प्रत्येक संतांचं जीवन हे समर्पित भावनेचं व्हावं.

❑❑❑

भक्त हा विनम्र असतो. निरंकार, गुरु आणि साधसंगतवर त्याचा पूर्ण विश्वास असतो. तो कधीही असा अभिमान करत नाही की, मी फार सुंदर बोलतो, सुंदर गातो, सुंदर कविता करतो; उलट ही तर परमात्म्याची कृपा आहे. असे तो मानतो. हा प्रभू-परमात्माच मला बोलवणारा, गाऊन घेणारा आणि लिहून घेणारा आहे; मग अभिमान तरी कशाचा करायचा ?

- निरंकारी बाबाजी



कथा : रंजना भांगरे (मुलुंड-मुंबई)

# शिंपल्या आणि माणूस

चार वर्षाचा मुलगा त्याच्या सहा वर्षांच्या बहिणीबरोबर बाजारात गेला होता. अचानक त्याच्या लक्षात आले, की त्याची बहीण मागे राहिली आहे. तो थांबला आणि त्याने मागे वळून पाहिले. ती एका खेळण्याच्या दुकानासमोर उभी राहिली होती. काही तरी मोठ्या औत्सुक्याने न्याहाळत होती.

तो माघारी तिच्याजवळ गेला आणि विचारले, ताई तुला काही हवंय का ? तिने एका बाहुलीकडे बोट दाखवले. त्या मुलाने एका जबाबदार भावाप्रमाणे ती बाहुली उचलून तिच्या हातात दिली. ती खूप आनंदी झाली होती.

दुकानदार हे सगळे पाहत होता. त्या मुलाचे प्रौढासारखे वागणे पाहून तो चकित झाला. मग

तो मुलगा काऊंटरजवळ आला आणि त्याने दुकानदाराला विचारले, ती बाहुली केवढ्याला आहे? तो दुकानदार अनुभवी आणि समंजस होता. त्याने आयुष्यात अनेक पावसाळे पाहिले होते. त्यामुळे त्याने अतिशय प्रेमाने त्या मुलाला विचारले, "तू किती पैसे देऊ शकतोस?" समुद्र किनाऱ्यावर गोळा केलेले शिंपले मुलाने खिशातून काढले आणि दुकानदाराला दिले. दुकानदारही जणू काही पैसे मोजत असल्याप्रमाणे ते शिंपले मोजू लागला. मग त्याने मुलाकडे पाहिले. मुलाने काळजीने विचारले, कमी आहेत का?

दुकानदार म्हणाला, नाही नाही. बाहुलीच्या किंमतीपेक्षा जास्तच आहेत. मग दुकानदाराने त्यातील चार शिंपले घेतले आणि उरलेले मुलाला परत दिले. त्या मुलाने ते शिंपले खिशात टाकले आणि तो बहिणीबरोबर पुढे चालू लागला. हे सगळे इतका वेळ पाहत असलेला दुकानातील नोकर चकित झाला. त्याने मालकांना विचारले. चार शिंपल्यांच्या मोबदल्यात तुम्ही त्याला महागडी बाहुली दिली? दुकानदार स्मितहास्य करत म्हणाला, आपल्यासाठी हे फक्त शिंपले आहेत. त्या मुलासाठी ते अतिशय मौल्यवान आहेत. ह्या वयात पैसे म्हणजे काय हे त्याला माहित नाही. पण मोठा झाल्यावर त्याला समजेल आणि जेव्हा त्याच्या लक्षात येईल, की त्याने केवळ शिंपल्यांच्या मोबदल्यात बाहुली खरेदी केली होती. तेव्हा त्याला माझी आठवण येईल. त्याचबरोबर या जगात चांगली माणसेदेखील आहेत याची त्याला जाणीव होईल. तो सकारात्मक विचार करु लागेल, एवढेच!

❑❑❑

पान क्र. ९ वरुन पुढे

ठीक आहे असं म्हणून राधा आपल्या कामाला निघून गेली.

एक तासानंतर माधवने पुन्हा हाक मारली आणि म्हणाला, माई बघा बाग स्वच्छ झाली की नाही?

अरे वा! फार चांगली सफाई केलीस. सर्व सामानसुध्दा व्यवस्थित ठेवलेस. चल बस येथे तुला मी जेवण देते. राधाने त्याच्यासमोर जेवण ठेवले तसे त्याने आपल्या खिशातून रुमाल काढला आणि त्यात ते बांधू लागला.

राधा म्हणाली, उपाशीपोटी तू काम केलेस. इथे बसून जेवण जेवलेस तर आणखी देईन.

त्यावर माधव म्हणाला, नाही माई! घरी आई आजारी आहे. सरकारी दवाखान्यातून दवा तर मिळाली पण डॉक्टर साहेबांनी सांगितले, की उपाशीपोटी दवा घेऊन नको.

राधाच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागल्या. तिने आपल्या हाताने माधवची दुसरी आई बनून माधवला जेवण भरविले.

त्यानंतर माधवच्या आईसाठी डब्यातून जेवण घेतले आणि आईला नेऊन दिले. राधा म्हणाली, ताई तू फार श्रीमंत आहेस! तू जी दौलत तुझ्या मुलाला दिलीस ती आम्ही आमच्या मुलांना देऊ शकत नाही.

आई-वडिलांविषयी असणारा पूज्यभाव, त्याग व समर्पण याला कसलीच तोड नाही.

❑❑❑



*चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)*

*चित्रांकन –रंग : अजय कालडा*


# आजोबा







काही दिवसानंतर चिमणा दाणे खाऊन, मोठा होऊन आपल्या घरट्याजवळ आला. त्याने पाहिले, की आपल्या घरट्यात ससा आरामशीर बसला आहे. त्याला त्याचा फार राग आला. तो सशाला म्हणाला, ऐतखाऊ कुठला, मी नाही तर माझ्या घरट्यात येऊन बसलास ?
हे घर माझं आहे, तू चालता हो इथून.
ससा म्हणाला, कुठलं तुझं घर ? हे घर आता माझं आहे. अरे विहीर, तलाव किंवा झाड इथून कोणी जेव्हा निघून जातो तेव्हा तर तो आपला हक्कही गमवून बसतो.
सशाचं बोलणं ऐकून चिमणा म्हणाला - असा वाद-विवाद करुन काही फायदा होणार नाही. चल आपण एखाद्या बुध्दिमान आणि समजदार व्यक्तिकडे जाऊया. तो निर्णय देईल तो आपण मान्य करुया.


झाडापासून काही अंतरावर एक बोका पुस्तक वाचताना त्यांना दिसला. सशाला आणि चिमण्याला तो विद्वान वाटला.
चिमणा आणि ससा त्याच्याकडे गेले, आपली समस्या त्याला सांगितली. ते म्हणाले, की वास्तविक ज्याचं घर असेल त्याला ते मिळालं पाहिजे आणि ज्याचा हक्क नसेल त्याने ते सोडून गेलं पाहिजे.
ससा आणि चिमण्याला पाहून बोक्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याला भूकही लागली होती. त्याने विचार केला, की दोघेही हट्टेकट्टे आहेत. बरेच दिवस अन्न शोधण्याची गरज नाही.


बोका म्हणाला, मी तुमचा न्याय करेन; परंतु मला काही गोष्टी तुमच्या कानात सांगायच्या आहेत; तुम्ही दोघेही जवळ या.
दोघेही जवळ येताच बोक्याने, सशाला पंजात आणि चिमण्याला तोंडात पकडले.
बोक्याने दोघांचाही फडशा पाडला. आपल्या मूर्खपणामुळे दोघेही प्राणास मुकले. दोघांनी जरासुध्दा विचार केला नाही, की शत्रूवर लगेच इतका विश्वास ठेवणे किती घातक असते.
तात्पर्य : दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ. म्हणून नेहमी ध्यानात ठेवायचे आहे, की बलवान आणि धूर्त शत्रूंपासून नेहमी चार हात दूर राहायचे.

## डॉ. अनघा भट



रशियन भाषातज्ज्ञ, अध्यापक, अनुवादक, संपादक, शब्दकोशकार अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या डॉ. अनघा भट या मुळात भाषाप्रेमी आहेत. रशियन भाषेच्या व्याकरणाने मला मराठी भाषेच्या व्याकरणाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली असे त्या अभिमानाने सांगतात. भाषाविषयांच्या प्रेमाखातर दहावीला चांगले गुण मिळवूनही त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये कला शाखेत प्रवेश घेतला. अर्थशास्त्रात पदवी घेतली. पदवीनंतर त्यांनी एमए ला प्रवेश घेतला.

एमए करताना मॉस्कोत जाऊन त्यांनी एक वर्षाचा रशियन लँग्वेज टीचर्स ट्रेनिंग डिप्लोमा पूर्ण केला. मॉस्कोतील राधुगा प्रकाशनाकडून रशियन भाषेतून मराठी भाषेत अनुवाद केलेली पुस्तके प्रकाशित होतात. या संस्थेत स्टायलिस्टिक एडिटर (शैलीसंपादक) या पदावर काम करण्याची त्यांनी संधी मिळाली. अन्य भाषांतील अनुवाद मूळ शैलीशी ताडून पाहणे हे त्यांचे काम. ते करतानाच त्यांना रशियन भाषेतील दोन पुस्तकांचे अनुवाद केले.

या काळात त्यांचे अध्यापनाचे कामही सुरु होते. ज्ञानदा फाऊंडेशनसाठी तिसरी-चौथीच्या मुलांना आणि कटारिया हायस्कूलमध्ये आठवी ते दहावीच्या मुलांना त्या रशियन शिकवत. कोणतीही परदेशी भाषा शिकण्यासाठी किमान साडेतीन-चार वर्षे लागतात. ऐकणे, बोलणे, लिहिणे आणि वाचणे ही चार कौशल्ये आत्मसात केली तरच ती भाषा येते. त्यांनी १९८६ पासून भाषांतराच्या कामास सुरुवात केली होती. सरकारी आणि संरक्षणविषयक कागदपत्रे; तसेच किर्लोस्कर, नायक्रोमसारख्या कंपन्यांसाठी त्यांनी भाषांतराचे काम केले. बालभारतीसाठी इयत्ता आठवीच्या रशियन भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे काम केले. रॉबर्ट मुझील, सल्तीकोव शिद्रीन आणि हेमिंग्वेच्या गोष्टी या पुस्तकासाठी भाषांतर-संपादन, बुनिन या नोबल पारितोषिक विजेत्या रशियन लेखकाच्या कथासंग्रहाचे भाषांतर-संपादन, अत् पुश्किन द चेखवा हे १९ व्या शतकातील लेखकांच्या कथांचे भाषांतर आणि नायक एका पिढीचा हे पुस्तक अशी त्यांची साहित्य संपदा.

अनुवाद करताना दोन्ही भाषांचे तपशील, पदर समजून घेणे आवश्यक असते. भाषांतरात आधी प्रयोग येतो, मग थिअरी. आधी भाषाशास्त्राचा विचार व्हायला हवा, असे त्या ठामपणे सांगतात. रशियन भाषेची लिपी वेगळी आहे. व्याकरण क्लिष्ट आहे, नियमांची संख्या जास्त आणि अपवाद कमी. हा अभ्यास करतानाच भाषेच्या रचनेकडे चिकित्सकपणे पाहण्याची दृष्टी त्यांच्यात भिनली. या भूमिकेतूनच त्यांनी रशियन-मराठी शब्दकोश आणि मराठी-रशियन-जर्मन शब्दकोशाचे संपादन केले.

यापुढील काळातही भाषा समीक्षा आणि भाषांतराची गुणवत्ता सुधारण्याचे काम करण्यावर त्यांचा भर राहील.



# किल्ले पारगड

सह्याद्रिच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या रांगेमधील सर्वात दक्षिणेकडील किल्ला म्हणजे पारगड किल्ला होय. चंदगड या तालुक्याच्या गावापासून साधारण ३० कि.मी. अंतरावर निसर्गरम्य तिळारी प्रकल्पापासून पुढे कोल्हापूर-सिंधुदुर्ग सीमेवर ऐतिहासिक पारगड किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून किल्ल्याची उंची २५०० फूट आहे. गडाच्या तिन्ही बाजूला कातळाची अभेद्य तटबंदी आहे. किल्ला आकाराने प्रचंड असून त्याचे क्षेत्रफळ अंदाजे ४० एकर आहे.

## पाहण्यासारखी ठिकाणे

गडावर जाण्यासाठी डांबरी रस्ता तयार करण्यात आला आहे. गडावर पोहोचण्यासाठी साधारण ३०० पायऱ्या आहेत. गडावर प्रवेश करताच आपल्याला तीन तोफा दिसतात. डाव्या हातास मारुतीचे मंदीर आहे. इथून मळलेल्या पायवाटेने पुढे गेल्यावर पारगडावरील शाळा लागते. शाळेच्या आवारातच छत्रपती शिवाजी महाराजांचा छोटासा पण पूर्णाकृती पुतळा चौथऱ्यावर बसविलेला आहे. या पुतळ्याच्या परिसरातच पूर्वी गडावरची सदर होती. येथून समोरच आपल्याला भवानी मातेचे मंदिर दिसते. या मंदिराचा कायापालटच करण्यात आला आहे. शिवकालीन मंदिर तसेच ठेवून त्याभोवती नवीन इमारत उभी करण्यात आली आहे. बांधलेले मंदिर भव्य असून नव्याने शिखर व सभामंडप बांधण्यात आले आहे. मंदिरात भवानी मातेची देखणी मूर्ती आहे. मंदिराच्या सभामंडपात शिवकालातील अनेक प्रसंग चितारलेली चित्रे लावली आहेत.

गडावर शिवकालातील १७ विहिरी आहेत त्यापैकी ४ चांगल्या अवस्थेत आहेत. बाकी बुजलेल्या आहेत. गडाच्या उत्तरेकडील बाजूस दरीच्या काठावर महादेवाचे मंदिर आहे. गडाची तटफेरी मारत असताना आपल्याला डौलदार बुरुज लागतात. भालेकर, फडणीस, महादेव, माळवे, भांडे, झेंडे अशी त्यांची नावे आहेत.

## गडावर जाण्याच्या वाटा

पारगडापर्यंत गाडीमार्ग आहे. पारगडापर्यंत चंदगडहून एस.टी. बसची सोय उपलब्ध आहे. ही बस गडाच्या पायऱ्यापर्यंत जाते. खाजगी वाहन गडाला वळसा घालून गडाच्या माथ्यावर नेता येते.

तसेच पाळ्ये व मोर्ले गावातूनही चालत गडावर जाता येते. चालत साधारणतः २ तासात गडावर पोहोचता येते. सध्या मोर्ले-पारगड रस्त्याचे काम चालू आहे.

❏❏❏

# मी भिकारी नाही

एक भिकारी होता. तो रेल्वेच्या आवारात नेहमी भीक मागत असे. एखादा चांगला सूटबूट घातलेला दिसला, की त्याच्याकडे तो आवर्जुन जात असे आणि आपण अगदी दीन बनून त्याच्याजवळ भीक मागतसे आणि बऱ्याच अंशी असे लोक एखाद्या भिकाऱ्याला बऱ्यापैकी भीक देतात तर काही लोक हेटाळणी सुध्दा करतात. परंतु हे सर्व सहन करण्याची त्यांना सवयच पडून गेलेली असते त्यामुळे त्यांना त्याचं काहीच वाटत नाही.

एके दिवशी एक सूटबूट घातलेल्या धनिकाला येताना त्याने पाहिले आणि लगेच तो त्याच्याजवळ गेला आणि भीक मागू लागला. तेव्हा धनिक त्याला म्हणाला, तू नेहमी दुसऱ्यांकडे मागत असतोस. तू दुसऱ्याला कधीतरी काही देतोस का ?

भिकारी म्हणाला, साहेब मी तर भिकारीच आहे. माझ्याजवळ काय आहे; ते मी दुसऱ्यांना देऊ शकेन ?

त्यावर धनिक म्हणाला, जर तू कोणाला काही देऊ शकत नाहीस तर तुला दुसऱ्याकडे मागण्याचाही हक्क नाही. मी एक व्यापारी आहे आणि देणे आणि घेणे यावरच माझा विश्वास आहे. जर तुझ्याजवळ मला काही देण्यासारखे असेल तरच मी तुला काहीतरी देईन. इतक्यात एका स्टेशनवर उतरुन धनिक निघून गेला.

इकडे भिकारी धनिकाच्या बोलण्याचा विचार करु लागला. धनिकाचं म्हणणे त्याच्या मनाला पटले. तो विचार करु लागला, की मी कोणाला काहीच देत नसल्यामुळे मला अधिक भीक मिळत नाही; परंतु मी तर भिकारीच आहे. मी तर कोणालाच काही देण्याच्या लायकीचा नाही. असे किती वर्षे लोकांना काही न देता लोकांकडे मागतच राहणार ?

बराच विचार केल्यानंतर निर्णय घेतला, की जी व्यक्ती मला भीक देईल त्याला मी सुध्दा त्याच्या बदल्यात काहीतरी देईन.

परंतु पुन्हा त्याच्या डोक्यामध्ये तोच प्रश्न निर्माण झाला, की मी स्वत: भिकारी आहे तर त्या भिकेच्या बदल्यात मी काय कोणाला देऊ शकतो ?

असा विचार करत करत त्याचा संपूर्ण दिवस निघून गेला; परंतु त्याला त्याच्या प्रश्नाचं उत्तर सापडले नाही.

नेहमीप्रमाणे दुसऱ्या दिवशी तो स्टेशनच्या आवारात भीक मागण्यासाठी येऊन बसला. तेव्हा त्याची नजर स्टेशनच्या परिसरात लावलेल्या फुलझाडांवर फुललेल्या फुलांवर पडली. मग त्याने विचार केला, की भीकेच्या बदल्यात मी त्यांना फुले का देऊ नयेत ? त्याच्या मनात आलेले विचार त्याला पटले आणि तिथली काही फुले त्याने तोडून आणली.

आता तो फुलं घेऊन ट्रेनमध्ये भीक मागायला गेला. त्याला भीक देणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला तो आपल्याजवळचे फूल देत असे. लोक खूश होऊन ते फूल आपल्याकडे ठेऊन घेत. अशाप्रकारे भिकारी रोज फूल तोडून आणत असे आणि भीक देणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला देत असे.

काही दिवसांनी त्याच्या लक्षात आले, की आपण भीकेच्या बदल्यात फूल दिल्यामुळे आपल्याला पूर्वीपेक्षा जास्त भीक मिळत आहे. तो स्टेशनमधील सर्व फुलं तोडून लोकांना देत असे. फुलं संपली म्हणजे त्याला फारशी भीक मिळत नसे. त्याचा हा

आता रोजचाच देण्या घेण्याचा व्यापार सुरु झाला होता.

एक दिवस ट्रेनमध्ये भीक मागत असताना तोच धनिक त्याला गाडीत बसलेला दिसला ज्याच्यामुळे भीकेच्या बदली फूल देण्याची प्रेरणा मिळाली होती. तो ताबडतोब त्या धनिकाजवळ गेला आणि भीक मागत असताना म्हणाला, आज माझ्याजवळ तुम्हाला देण्यासाठी काही फुलं आहेत. मला आपण भीक द्या त्याबदल्यात मी तुम्हाला फुलं देतो. धनिकाने त्याला काही पैसे दिले व त्या बदल्यात भिकाऱ्याने त्याला फुलं दिली. भिकाऱ्याच्या स्वभावात आलेला बदल पाहून त्याला फार बरं वाटलं. तो म्हणाला, वाह वा! फारच छान! आज तू सुध्दा माझ्यासारखा एक व्यापारी झालास. एवढं बोलून त्याच्याकडची फुलं घेऊन ती फुलं न्याहाळत, वास घेत तो गाडीतून उतरला आणि आपल्या घरी निघून गेला.

पंरतु भिकाऱ्याच्या मनात ते धनिकाचे शब्द अजून खोलवर विचार करायला लावत होते. त्या विचाराने तो क्षणोक्षणी खूश होत होता. त्याच्या डोळ्यामध्ये एक वेगळीच चमक दिसू लागली. आता त्याला असे वाटू लागले, की आपल्या हातात आता अशी चावी मिळाली आहे, की आपण त्याच्यामुळे आपले जीवन बदलू शकतो.

तो लगेच ट्रेनमधून खाली उतरला आणि आनंदित होऊन आकाशाकडे तोंड करुन मोठ्याने ओरडला, की भिकारी नाहिये, मी एक व्यापारी आहे. मी सुध्दा त्या धनिकासारखा बनू शकतो, मी श्रीमंत होऊ शकतो.

असे करताना लोकांनी त्याला पाहिलं आणि आपसात चर्चा करु लागले, की कदाचित याला वेड लागले असावे. त्यानंतर तो भिकारी त्या स्टेशनवर भीक मागताना कधीच दिसला नाही. एक वर्षानंतर याच स्टेशनवर सूटबूट घातलेले दोन प्रवासी गाडीतून जाण्यासाठी तेथे आले होते. दोघांनीही एक दुसऱ्याला पाहिले आणि त्यातील एकाने दुसऱ्याला हात जोडून नमस्कार केला आणि म्हणाला, काय आपण मला ओळखलंत का?

धनिक म्हणाला, नाही ओळखलं. कदाचित आज आपली पहिल्यांदाच भेट झाली असावी. भिकारी म्हणाला, शेटजी आठवण करा, पहिल्यांदा नव्हे तर आपली ही तिसऱ्यांदा भेट होत आहे. धनिक म्हणाला, मला काही आठवत नाही, की यापूर्वी आपण दोन वेळा कधी भेटलो होतो.

आता पहिली व्यक्ती हसत-हसत म्हणाली, आम्ही यापूर्वी सुध्दा या ट्रेनमध्ये दोन वेळा भेटलो होतो. मी तोच भिकारी आहे ज्याला आपण पहिल्याच भेटीत सांगितले होते, की जीवनात काय करायला पाहिजे. दुसऱ्या भेटीत मला सांगितले, की वास्तविक मी कोण आहे? परिणाम असा झाला, की मी आज फुलांचा फार मोठा व्यापारी आहे आणि या व्यापाराच्या कामासाठी मी दुसऱ्या शहरात जात आहे.

तुम्ही मला पहिल्या भेटीत प्रकृतीचा नियम सांगितला होता, की आपल्याला तेव्हाच काही मिळू शकते जेव्हा आपण दुसऱ्यांना काही देऊ. देणे-घेणे हा व्यवहार खरे काम करतो, मी हे चांगल्या प्रकारे अनुभवले आहे. परंतु मी स्वत:ला नेहमी भिकारीच समजून राहिलो. त्याबाबत कधीच विचार केला नव्हता. ज्यावेळी तुमच्याशी माझी दुसरी भेट झाली तेव्हा तुम्ही म्हणाला होता, की आता तू एक व्यापारी झाला आहेस. आता मी भिकारी नसून वास्तविक एक व्यापारी बनलो आहे.

म्हणूनच संत महात्मा महापुरुष यांनी देखील हेच सांगितले आहे, माणसाने नेहमी स्वत:ला ओळखले पाहिजे. नेहमी सकारात्मक विचार करायला पाहिजे.

❑❑❑

# शरीराचा अशक्तपणा फरसबी दूर करते

फरसबी ही भारतातील प्रमुख शेंगभाजी आहे. शेंगवर्गीय इतर भाज्यांच्या तुलनेत या प्रकारात जास्त कॅलरीज असतात व त्या तुलनेत प्रोटीन्स मात्र कमी असतात. प्रोटीन्सच्या कमी प्रमाणामुळे फरसबी वृध्दांसाठीही उत्तम आहार आहे. फरसबीमध्ये प्रामुख्याने फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम, पोटॅशियम व जस्त इ. खनिजतत्त्वांची रेलचेल असते. फरसबीचे वनस्पतीशास्त्रीय नाव फ सिओलस वल्गारिक आहे. जाणून घेऊया फरसबीमधील औषधी गुण.

आधुनिक विज्ञानामध्ये या शेंगातील रस सेवन केल्याने आपल्या शरीरातील इन्शुलिन नामक हार्मोनचा स्त्राव वाढतो. या गोष्टीची पुष्टी केली जाते. यामुळेच फरसबी ही मधुमेहासाठी गुणकारी मानली जाते. फरसबीच्या बिया वाळवून ते चूर्ण रोज दोन वेळा तोंडात टाकून सेवन केल्याने मधुमेह लवकर बरा होतो. मुलांना मात्र हे चूर्ण देऊ नये.

पाताळकोटमधील हर्बल तज्ज्ञ फरसबी व कोबीचा रस एकत्र करुन तो सेवन करतात. या आदिवासींचे असे म्हणणे आहे, की मधुमेह रोखण्यासाठी व बरा करण्यासाठी फरसबी हा रामबाण उपाय आहे. गुजरातमधील डांग प्रांतातील आदिवासी फरसबीच्या शेंगा वाटून वा किसणीवर बारीक किसून जाड कपड्यातून त्यापासून रस काढतात व हा रस अशक्त शरीराचे रुग्ण व ताप आलेल्या रुग्णांना दिला जातो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे यामधील पोषकतत्त्वांची भरपूर मात्रा असते व अशक्तपणा दूर करण्यासाठी ते प्रभावी टॉनिक आहे. काही आदिवासी या शेंगाचा रस हा संधिवातावरही गुणकारी असल्याचे मानतात. या शेंगातील बिया वाळवून त्यांचे चूर्ण तेलात मिसळून संधिवातामुळे दुखणाऱ्या भागावर त्याचा लेप लावला असता वेदना ताबडतोब नाहीशा होतात.

फरसबी मेंदूची क्षमता व शारीरिक बल यांची वृध्दी करते. दीर्घ आजारानंतर येणारा अशक्तपणा घालविण्यासाठी फरसबीचा रस नियमित ७ दिवसांपर्यंत २५० मिली. या प्रमाणात सेवन केल्याने शरीरात शक्तीचा संचार होऊ लागतो.

शरीरामध्ये नेहमी जाणवणारा थकवा, जास्त घाम येणे व अशक्तपणा दूर करण्यासाठी आदिवासी टोमॅटोबरोबर फरसबी उकळून सूप तयार करतात व ते रुग्णाला दिवसातून २ वेळ असे चार दिवस देतात. फरसबीचे हे सूप फारच शक्तीवर्धक मानले जाते.




❐❐❐

# आसन : गोमुखासन

गो म्हणजे गाय आणि मुख म्हणजे तोंड. या आसनामध्ये शरीराचा आकार गायीच्या मुखाप्रमाणे दिसतो. म्हणून या आसनास गोमुखासन असे म्हणतात. चौऱ्याऐंशी आसनामधील हे एक आसन आहे.

**कृती :-** डावा पाय मागील बाजूस वाकवून डाव्या टाचेस नितंबाच्या डाव्या बाजूखाली ठेवा, नंतर उजवा पाय अशाप्रकारे वाकवा, की उजवा गुडघा डाव्या गुडघ्यावर येईल आणि उजव्या पायाचा तळवा डाव्या मांडीखाली येईल. या आसनाचा नियमित सराव केल्यानंतरच उजव्या पायाची टाच डाव्या मांडीपर्यंत आणता येईल. आता डावा हात कोपराशी वाकवून डोक्याकडे न्या आणि मानेखाली खांद्याच्या मध्ये टेकवा. आता उजवा हात कोपराशी वाकवून मागील बाजूने वर घ्या. त्यानंतर डाव्या हाताचे पहिले व दुसरे बोट आणि उजव्या हाताचे पहिले व दुसरे बोट एकमेकांत गुंफा, जर बोटे झटकू लागली तर पुन्हा दोन मिनिटांपर्यंत प्रयत्न करा. हळूहळू श्वास घ्या. शरीराचा वरचा भाग आणि मस्तक एका सरळ रेषेत ठेवा. स्थूल माणसाला हे आसन प्रथम काही दिवस अवघड जाईल. परंतु सतत सराव केल्यास हे आसन बरोबर करता येईल. हे आसन सुरुवातीला चार वेळा करावे. नंतर सहा वेळा करावे. नंतर सरावाची वेळ पंधरा मिनिटांपर्यंत वाढवत न्यावी.



**फायदे :**

- या आसनामध्ये तिन्ही बंध (जालंधरबंध, उड्डियानबंध आणि मूलबंध) दृढतापूर्वक होत असल्याने सुषम्ना नाडीमध्ये प्राणवायूचा प्रवाह सुरु होतो. त्यामुळे चित्तवृत्ती काबूत येण्यास मदत होते.
- या आसनामुळे बगलेमध्ये झालेली गाठ बरी होते.
- हे आसन पद्मासन आणि सिध्दासनाच्या कक्षेतील असल्याने पद्मासन व सिध्दासन यांच्याद्वारे जे फायदे होतात, ते सर्व या आसनामुळेही प्राप्त होतात.
- या आसनामुळे पायाचा संधिवात बरा होतो व मूळव्याधीचीही तक्रार दूर होते.
- या आसनामुळे बध्दकोष्ठता, मंदाग्नी, अरुची, पाठीतले दुखणे व हातातली लचक बरी होते.
- हे आसन ब्रह्मचर्यव्रतासाठी आणि आरोग्यासाठी मदतरुप होणारे आहे.

# वाढदिवसाच्या


-


अविष्कार डुरे


क्षितीशा धनावडे


सुधिता मोरे


सई महाडिक


ओम शिंदे


मुग्धा तळप


दक्ष कुलवडे


सोहम कार्ले


सुरभि टिळे


हर्षल तायडे


शौर्य पवार


संयम सोनवणे



दक्ष रिटे



मानवी गव्हाणे


वरद तांदळे

# हार्दिक शुभेच्छा


संस्कृती धुमाळ


विआन मयेजर


विनीत हिवाळे


आहट बारगडे


शलोक बातुलकर


सिध्दार्थ धुमाळ


विधिता विरकर


सिया बारी


ईश्वरी नाळे


हर्षिता भानत


श्रीमंत चौगुले


वैभवी पाटील


कौशिक पाटील


सुहान दळवी


आविष्कार व समर्पण

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न : कमळाचे पान जलाशयावर का तरंगते ?

उत्तर : कमळाच्या पानाचे देठ लांब असते व त्याच्या उतीत खूप पोकळ्या असतात. या पोकळ्यात हवा साठलेली असते. त्यामुळे कमळाचे पान जलाशयावर तरंगते. कमळाच्या पानावर मेणासारखा तेलकट थर असतो. त्यामुळे त्याच्या पृष्ठभागावर जमा झालेले पाणी ओघळून जाते.

प्रश्न : कापूर जळताना ज्योत दिसते पण कोळसा जळताना ज्योत का दिसत नाही ?

उत्तर : ज्या इंधनात जळणारा पदार्थ बाष्पनशील आहे असे इंधन जळताना ज्योत मिळते. कापरामधील ज्वलनशील पदार्थास उष्णता मिळताच त्याचे वायूत रुपांतर होते व तो जळत असताना ज्योत मिळते; परंतु कोळशात बाष्पनशील पदार्थ नाही म्हणून कोळसा जळताना ज्योत मिळत नाही.

प्रश्न : वटवाघळांना कमी दिसत असून सुध्दा रात्री उडतांना एखाद्या वस्तूला त्यांची धडक का बसत नाही ?

उत्तर : वटवाघळं ही दिवसा झाडावर लटकलेली असतात. ती खाद्य शोधण्यासाठी रात्री प्रवास करतात. रात्री अंधारातून उडताना त्यांच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या तीव्र लहरी त्यांना कोठेही न धडकण्यासाठी मदत करतात. त्यांच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या या लहरी वस्तूला धडकून परत येतात. त्यामुळे त्यांना समोर येणारे अडथळे समजतात. या लहरींचा त्यांना शिकार पकडण्यासाठीही उपयोग होतो.

निरनिराळ्या ध्वनींची तीव्रता (फ्रिक्वेन्सी) वेगवेगळी असते. ज्या ध्वनींची तीव्रता २० ते २०,००० हर्टझ दरम्यान असते, त्यांना सोनिक ध्वनी म्हणतात. तर २०,००० हर्टजपेक्षा जास्त तीव्र ध्वनीला अल्ट्रासोनिक ध्वनी म्हणतात. यावरच वटवाघळांची उडण्याची क्रिया अवलंबून असते. वटवाघळांचे डोळे कमकुवत असतात. परंतु ते अंधारातच अधिक सक्रिय होतात. वटवाघळे उडताना अल्ट्रासोनिक ध्वनी उत्पन्न करतात. ते आपल्याला ऐकू येत नाहीत; परंतु वटवाघळात ऐकण्याची क्षमता असते. हा अल्ट्रासोनिक ध्वनी जेव्हा एखादे झाड, डोंगर, गुहेच्या भिंतीसारख्या पृष्ठभागावर आदळून परावर्तित होऊन परत येतो तेव्हा वटवाघळे तो ऐकतात व आपल्यातील व त्या अडथळ्यातील अंतर व्यवस्थित जाणतात. म्हणून वटवाघूळ रात्री उडताना कोणत्याही वस्तुला धडकत नाही.

दिन विशेष : २ एप्रिल

# वाढत्या शहरीकरणामुळे वाढत आहे पालक व मुलांमध्ये संवादाची दरी
# मुलांच्या सर्वांगिण विकासात पालकांची भूमिका महत्त्वाची

२ एप्रिल हा ऑटिझम जागरुकता दिवस म्हणून पाळला जातो. ऑटिझम म्हणजे नेमके काय? हे फार कमी लोकांना माहीत असते. कारण याबाबत पालकांमध्ये जागरुकता फार कमी आहे. आपल्या मुलाला अथवा मुलीला झाला आहे, हे पालकांच्या लक्षात येत नाही. वाढत्या शहरीकरणामुळे घरातील आई-वडील हे नोकरी-धंद्यानिमित्त बराच वेळ बाहेर असल्याकारणाने त्यांचा आपल्या मुलांशी संवाद कमी झाल्याने त्यांना ही लक्षणे फार उशिरा कळतात. पूर्वीच्या काळी ऑटिझम हा फार कमी मुलांना होत होता, पण आता त्यांची संख्या वाढली आहे.

ऑटिझम म्हणजे स्वमग्नता. मुलांच्या विकासामध्ये येणारा अडथळा किंवा वाढीमध्ये येणारा विस्कळीतपणा. यामुळे मुलांचा इतरांशी होणारा संवाद आणि सामाजिक वर्तणुकीवर फार तीव्र आणि व्यापक परिणाम होतो. वागणूक साचेबध्द होऊन जाते आणि कोणत्या तरी एकाच गोष्टीची आवड निर्माण होते. नॉर्मल मूल जर एखादे तासच खेळू शकले, तर ऑटिझम असलेले मूल तोच खेळ पाच-सहा ताससुध्दा खेळू शकेल. यासाठी पालकांनी आपल्या मुलांकडे बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अनेक पालक अशा मुलांवर फार उशिरा उपचार सुरु करतात त्यामुळे बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच अशा मुलांना शाळेतही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. अशावेळी हे पालक शाळा बदलण्याचा निर्णय घेतात. पण त्यांनी तसे न करता आपल्या मुलांवर त्वरित व योग्य उपचार सुरु करावे.

## ऑटिझमची लक्षणे :

उशिरा बोलण्यास सुरुवात होते. खूप कमी आवाजात बोलणे. फक्त उशिरा बोलणे हीच तक्रार नसून ही मुले देहबोलीचाही उपयोग करतात. उदा. काही हवे असल्यास त्या गोष्टीकडे बोट दाखवणे किंवा मान हलवून नाही म्हणणे इत्यादी. इतर मुलांमध्ये मिसळण्याचा कल नसतो. स्वतःच एखादा खेळ खेळताना दिसतात. विचित्र आणि एका जागेवर न थांबण्याच्या सवयी, अनुकरण न करता येणे. आवाज, स्पर्श, वास, चव याबाबतीत अतिसंवेदनशीलता, भाषा असंबंधपणे वापर करणे

## ऑटिझमवरील उपचार :

वरील लक्षणे आढळून आल्यास मुलाचे लवकरात लवकर निदान व उपचार करणे अत्यंत आवश्यक असते. कारण लहान वयात किंवा सुरुवातीपासून सातत्याने जर उपचार केले तर त्यांच्यात सुधारणा होऊ शकते.

पालक शिक्षक आणि संबंधीत विषयातील तज्ज्ञ या सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असतो.

सुरुवातीला केलेल्या परिक्षणातून निदान आणि तीव्रता जाणून घेता येते.

मुलांच्या विकासातील दोष पालकांनी मान्य केला तर लवकर सुरु झालेले उपचार भविष्यात मुलांना फायदेशीर ठरतात.

संवेदनेसंबंधी तसेच भाषाविकास आणि एखाद्या विचित्र किंवा विशिष्ट सवयीतील बदल या गोष्टींचा समावेश या उपचार पध्दतीमध्ये औषधांपेक्षाही महत्त्वाचा असतो.

पालकांनी सतत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच उपचार करावेत, फर्माकोथेरपी ही उपचार पध्दत त्यांच्या शैक्षणिक आणि कुमारावस्थेवर होणाऱ्या परिणामांसाठी फायदेशीर आहे.

नैसर्गिक अन्न, जीवनसत्त्वे बी-६, मॅग्नेशिअम, नैसर्गिक जीवनसत्त्वे, एल-कारनोसिन या गोष्टी उपचारासाठी सहाय्यभूत ठरु शकतात.

❏❏❏

दिव्य वाणी

# सहनशीलता

आज जगामध्ये सहनशीलतेची कमतरता आहे. लहान-सहान गोष्टींवरुन माणूस हाणामारी करायला तयार होतो. असहनशीलतेमुळेच माणूस निर्दयी बनून राक्षसी कृत्य करण्यास प्रवृत्त होतो.

प्रभू भक्त आध्यात्मिकतेच्या रंगात रंगून गेलेले असतात त्यामुळे त्यांच्यात सहनशीलता विद्यमान असते. ते इतके मजबूत असतात, की त्यांच्याविषयी कोणीही कितीही कठोर बोलले तरी ते सहजतेने सहन करतात. जर प्रत्येक माणूस असाच सहनशीलतेने वागेल, एक दुसऱ्याच्या कामी आला तर या जगाचे सुंदर असे रुप पहायला मिळेल.

भक्तजनांचे हृदय विशाल असते. कारण त्यांच्या मनाचे नाते या विशाल प्रभू परमात्म्याशी जोडलेले असते. जर या विशाल परमात्म्याची जाणीव असेल तर मनात चांगले विचार येतात, मन शुध्द राहते, मनात विशालता येते, नम्रता येते, दास भावना येते आणि म्हणून मन सदैव आनंदित राहते. जर आपल्या पायातील चपलेमध्ये लहानसा खडा गेला तर तो काढून टाकेपर्यंत आपल्याला चैन पडत नाही, त्रास होतो. यासाठी संतजन म्हणतात, की जोपर्यंत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सररुपी खडे आपण मनातून काढून टाकत नाही तोपर्यंत



आपल्याला खऱ्या आनंदाचा अनुभव होणार नाही.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

मुलगा जर सद्‌गुणी असेल तर तो एका कुळाचा उद्‌धार करतो; पण मुलगी सद्‌गुणी असेल तर ती दोन्ही कुळांचा उद्‌धार करते.

**- बाबा गुरबचनसिंहजी**

# पहाट झाली

किलबिल किलबिल
करु लागल्या चिमण्या
झाडावरती पहाट झाली उठा
म्हणूनी आम्हा जागविती

कोंबडा अरवला, जागवी जगाला
सवय चांगली, प्राणी जोपासती ।।१।।

पूर्व दिशेला, लाली चढली
हळूच गभस्ती, येती वरती ।।२।।

पक्ष्यांची रांग लागली
आकाशी तोरणे भासली
गाई वासरे हंबरुनी
तुतारी फुंकती ।।३।।

अभ्यासू उठले, व्यायामी नटते
कृषक उठोनी जाती शेतावरती ।।४।।

गृहिणी जागली, सडे संमार्जनी रंगली
राऊळी मंडळी, भूपाळी गाती ।।५।।

कविता : कृ. गो. निकोडे (गुरुजी)
(गडचिरोली)



# हसा मुलांनो हसा




कंजूष पती-पत्नी असतात. त्यांच्या घरी पाहुणा येतो.
पती : (पत्नीला) अगं पाहुणे आलेत. छानपैकी कांदेभजी कर.
पत्नी : (आतूनच) अहो बेसनपीठ नाही आणि कांदेही नाहीत घरात.
पती : बरं, मग निदान चहातरी ठेव मस्तपैकी.
पत्नी : अहो, घरात दूध नाही, चहापावडर नाही, कसला डोंबलाचा चहा करु ?
पती : (रागारागाने उठत) अवदसा कुठली, पाहुण्यांसमोर माझी इज्जत घालवतेस, थांब आलोच मी काठी घेऊन. (आतमध्ये सपासप मारण्याचे आवाज आणि पत्नीचा मोठ्याने रडण्याचा आवाज ऐकून पाहुणा उठतो)
पाहुणा : चहा वगैरे राहू द्या. मी निघतो. मला लगेच जायचे आहे (पाहुणा निघून जातो. पती-पत्नी दोघंही आतल्या खोलीतून हसत-हसत बाहेर येतात)
पती : काय मज्जा आली, मी कसं मारल्यासारखं केलं.
पत्नी : आणि मी कसं रडल्यासारखं केलं (तेवढ्यात तो पाहुणा प्रवेश करतो)
पाहुणा : आणि मी कसं गेल्यासारखं केलं !

लीलाकाकू : (बाळूकाकांना) काय हो, तुम्ही ऑपरेशन थिएटरमधून पळून का आलात ?
बाळूकाका : काय करु, अगं नर्स सारखं सांगत होती, घाबरु नका, नर्व्हस होऊ नका, हिम्मत बाळगा.
लीलाकाकू : अहो, मग चांगलंच तर सांगत होती ना ती !
बाळूकाका : अगं, पण ती मला नाही: डॉक्टरांना सांगत होती ना !



विश्वासरावांच्या घरी दोन पाहुणे आले. विश्वासरावांनी बंदूक काढली आणि त्यातून दोन बार काढले.
पाहुणे : हा काय प्रकार आहे विश्वासराव, आमचं काही चुकलं का ?
विश्वासराव : नाही रे मित्रा, चौकातील हॉटेलमध्ये दोन चहा सांगितल्या. त्यावर हॉटेल मालकाने चार आवाज काढले.
पाहुणे : हे काय आता ?
विश्वासराव : मागील दोन चहाचे पैसे देणे बाकी आहे हे त्याने चार आवाज करुन सांगितले.





एका शहरात एका इंग्रजी क्लासवाल्याने जाहीरात लावली होती - एका महिन्यात फाडफाड इंग्रजी बोलायला शिका- महिलांसाठी ५०% सूट

गण्या : काय हो, स्त्री-पुरुष समानतेच्या युगात हा तुमच्याकडे भेदभाव का ?

क्लासवाले : कारण स्त्रीयांना पहिल्यापासूनच फाड-फाड बोलायची सवय असते. म्हणजे आमचं अर्ध काम झालेलंच असतं. आता फक्त त्यांना इंग्रजी शिकवायचं असतं.

मुंबईहून कोल्हापूरला आलेले पाहुणे महिपतरावांशी गप्पा मारत होते. त्यांच्या गप्पा सातवीत शिकत असलेला गणूही ऐकत होता.

पाहुणे : काय गणू, मोठेपणी काय व्हायचं ठरवलंय ?

महिपतराव : अवं आमचा गणू लई मोठ्ठा डाक्टर व्हनार हाय !

पाहुणे : अरे वा ! छान छान ! काहो महिपतराव, तुमच्या कोल्हापुरात पांढरा रस्सा आणि तांबडा रस्सा का पितात ?

गणू : (मध्येच तोंड घालत) त्याचं काय ये काका, आपल्या शरीरात तांबड्या आणि पांढ्या पेशी असतात ना, म्हणून मग तांबड्या पेशीला तांबडा रस्सा आन् पांढ्या पेशीला पांढरा रस्सा. आसं !




यमी बारावीच्या पेपरला बसली होती; पण पेन आणायचं विसरली. इतक्यात छोटी पिंकी धावतच वर्गात पेन घेऊन यमीकडे आली.

पिंकी : (हात पुढे करत) मम्मी पेन....

वर्गातील सर्व मुलं (आश्चर्याने) : ओह मम्मी ?

एक मुलगी : तुम्ही कोणता साबण वापरता ? संतूर की .........

परीक्षक : संतूर-बिंतूर काही नाही, यमी बारावीला सात वेळा नापास झाली. आता आठव्यांदा बसतेय ती !



शिक्षक : पाण्यापेक्षा हलका पदार्थ कोणता ?

बन्या : सर, भजे

शिक्षक : ते कसे काय ?

बन्या : तेल पाण्यावर तरंगते; पण भजे तर तेलावरही तरंगते.

# तुपाची घागर

समर्थ जांबेहून निघाले ते मातापुरास जाऊन एका वर्षाने पुन्हा जांबेस आले. मातोश्रींचे व श्रेष्ठांचे (मोठ्या बंधूंचे) दर्शन घेऊन ते तेथे काही दिवस राहिले.

समर्थ तेथे असतानाच रामनवमीच्या उत्सवास प्रारंभ झाला. नऊ दिवस यथासांग उत्सव झाल्यावर दशमीच्या दिवशी पुष्कळच ब्राह्मण जमा झाले. स्वयंपाक तयार होऊन नेवैद्य वाढण्याचा समय आला. श्रेष्ठांनी नेवैद्य आणा म्हणून आज्ञा केली; परंतु तूप आलेले नव्हते. म्हणून श्रेष्ठांचे चिरंजीव रामचंद्रबोवा फार चिंतित झाले व दरवाज्यात वारंवार खेपा घालू लागले. हे पाहून समर्थांनी त्यांना जवळ घेऊन विचारले, "बाप्पा, तू असा मलूल का ? तुला कोणी बोललं की काय ?"

रामचंद्रबोवांनी हात जोडून म्हटले, "मला कोणी बोललं नाही. श्रेष्ठ नेवैद्य आणण्याची घाई करीत आहेत. परंतु कारभाऱ्यांनी शेजारच्या गावी तुपाकरीता पाठविलेला मनुष्य अद्याप आला नाही. तेव्हा आता काय करावं, ह्या चिंतेत पडलो आहे."

तेव्हा समर्थांनी कारभाऱ्यांना हाक मारुन म्हटले, "ह्याची तयारी पूर्वीच का केली नाही ?"

नंतर रामचंद्रबोवास म्हणाले, "बरे असो द्या. काळजी करु नका." श्रेष्ठांचे मुंजे या नावाचे शिष्य होते, त्यांना हाक मारुन त्यांनी मातीची घागर आणून ती स्वच्छ धुऊन विहिरीवरुन स्वच्छ पाण्याने भरुन आणावी अशी आज्ञा केली. त्याप्रमाणे मुंज्यांनी घागर आणून समर्थांपुढे ठेवली. समर्थांनी त्या घागरीस स्पर्श केला व मुंजे यांना सांगितले, की या घागरीतील तूप काढून नेवैद्यास द्यावे तसेच रामचंद्रबोवांना सांगितले, "नेवैद्य होताच मुंजे यांच्याकडून घागरीतून तूप पंक्तीस वाढावे."

त्याप्रमाणे सर्व व्यवस्था झाली. दोन तीन पंक्ती उठल्या. शूद्रादिकांची भोजनेही झाली. तोपर्यंत घागरीतील तूप मुंजे वाढतच होते. नंतर रामचंद्रबोवा यांनी समर्थांना सांगितले, "घागर तुपाने अद्याप भरलेलीच आहे." तेव्हा समर्थांनी किंचित स्मित करुन म्हटले, "बाप्पा, ही तुपाची घागर जतन करुन ठेवावी व प्रतिवर्षी स्वच्छ धुऊन तुपाने भरुन तिची पूजा करावी. नंतर आई पुरवठ्यास ये अशी प्रार्थना करुन मुंजे यांनीच तूप वाढावे. म्हणजे कितीही पंक्ती झाल्या तरी तूप संपणार नाही."

ही सर्व हकीकत रामचंद्रबोवा यांनी श्रेष्ठांना सांगितली. तेव्हा श्रेष्ठ म्हणाले, "ही बेगमी केवळ तुझीच केली नाही तर तुझ्या वंशाचीही केली." आजही ती घागर अद्याप तशीच जतन करुन ठेवलेली आहे.

समर्थांनी थोडे दिवस गेल्यानंतर कृष्णातीरी जाण्यास श्रेष्ठांची आज्ञा मागितली. तेव्हा दोघांनी एकांतात बसून पुष्कळ संभाषण केले. नंतर त्यांनी परस्परांना आलिंगन दिले, तेव्हा दोघांच्याही नेत्रांतून आनंदाश्रू वाहू लागले. नंतर समर्थ श्रेष्ठांची आज्ञा घेऊन चाफळास गेले.

❍ क्रमशः

# बाबा गुरबचनसिंहजींचा मुलांना उपदेश

मुलांनो, ज्याप्रमाणे कुंभार ओल्या मातीला पाहिजे तसा आकार देऊन एक सुबक मडके किंवा मातीची वस्तू बनवतो. त्याचप्रमाणे तुमचं जीवन ओल्या मातीप्रमाणे आहे. जर तुम्हाला योग्य वातावरण मिळालं नाही तर तुमचं जीवन अयोग्य दिशेने वाटचाल करेल. योग्य दिशेने चालण्यासाठी या स्पर्धात्मक जगात जीवनात सकारात्मक असणं आवश्यक आहे. यासाठी योग्य संगत निवडणं गरजेचं आहे. वाईट दिशेने घेऊन जाणाऱ्या संगतीकडे कधी जाऊ नये. याने आपले नुकसान आहे. अशा दिशेने जाणाऱ्यांना वाईट संगतीपासून दूर करण्याचा प्रयत्न करावा.

समाजातील घातक प्रवृत्तीला बळी पडू नये जेणेकरुन आई-वडिलांनी केलेल्या संस्काराला ठेच लागेल. समाजात वावरताना सद्गुणांचा व सकारात्मकतेचा वर्षाव करावा; जेणेकरुन प्रत्येकजण तुमच्याकडे बघून आकर्षित झाला पाहिजे.

ज्यांनी आपल्याला जन्म दिला, त्यांचा सदैव आदर ठेवावा. त्यांना दु:ख होईल असं काम कधी करु नये. त्यांच्या आदेशाचं पालन करावं. त्यांची सेवा करावी. घरकामात आईची मदत नि:संकोच पणे करावी. जेणेकरुन तुमच्या या सकारात्मक गुणांचा आदर्श प्रत्येक मूल घेईल आणि प्रत्येक आई वडिलांचा आदर करु लागेल.

तुम्ही उत्तम नागरिक, सुशिक्षित व्यक्ती बनावे यासाठी आई-वडिल सदैव प्रयत्न करतात. तुम्हाला योग्य शिक्षण मिळावे म्हणून कार्यशील असतात. मुलांनो, जर तुम्ही उच्च शिक्षण घेतलं तरच तुम्हाला इंजिनीअर, डॉक्टर इ. सारखी मोठी पदं मिळू शकतील. शिक्षणात तुम्ही मागे रहाल तर तुम्हाला उन्हातान्हात कामं करावी लागतील.


मुलांनो, तुम्ही आजच्या जगात अंग मेहनतीची सवय लावून घेणे आवश्यक आहे. परिश्रम आणि संघर्ष करुन एखादी गोष्ट मिळवली तरच तुम्हाला त्या गोष्टीची किंमत समजेल, अन्यथा आळशी बनाल. आज तुम्हाला ज्या सुख-सोयी मिळत आहेत, त्यासाठी आई-वडिलांचे आभार माना. कारण दुर्गम-मागासलेल्या परिसरात जाऊन दृश्य बघाल तेव्हा तुम्ही किती सुखी आहात याची जाणीव तुम्हाला होईल.

तसेच सत्संगाला वेळेवर पोहचणे आवश्यक आहे. जर कधी वेळ मिळाला तर सत्संग सुरु होण्याआधी सेवेत हातभार लावला पाहिजे. सत्संग शांतचित्ताने श्रवण केला पाहिजे. जेव्हा विचार अथवा गीतासाठी संधी मिळेल तेव्हा न घाबरता बोलावे. त्यासाठी हसती दुनिया वाचणं आवश्यक आहे. घरी येणाऱ्या संत महापुरुषांची सेवा करावी. परिवारासोबत दिवसातून एकदा तरी नामस्मरण करावे.

मुलांनो, असे काही सकारात्मक गुण जर अंगी बाणवले तर तुम्ही सद्गुरुच्या वचनाप्रमाणे चालते फिरते मंदिर बनाल.

(संदर्भ : जीवंत शिक्षक)

❑❑❑



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा







आईच्या शिकवणीमुळेच किट्टी लहान असूनसुध्दा फार समजूतदार झाली होती.
किट्टीचा व्यवहार शिष्टाचारपूर्ण तसेच सभ्यतेचा होता. त्याचे सारे श्रेय तिच्या आईला जाते. ती नेहमी किट्टीला हेच सांगत असे, की सद्व्यवहारामुळेच लोक आपला मान-सन्मान करतात आणि आपल्या या स्वभावामुळेच इतर लोक प्रभावित होतात.
उन्हाळ्यातील सुट्टीचे दिवस होते. किट्टी आपल्या वडिलांसोबत किल्ल्यावर आली होती. घरापासून जवळच किल्ला असल्यामुळे किट्टी रोज वडिलांसोबत किल्ल्यावर जात असे. त्यामुळे तिला किल्ल्याची सर्व माहिती होती.
एके दिवशी तिचे वडील किट्टीला किल्ल्यावर एकटे सोडून काही कामासाठी बाहेर गेले होते. किट्टी किल्ल्याच्या बाहेरील मैदानात खेळत होती.


इतक्यात काही पर्यटक किल्ल्याच्या दारावर बराच वेळ उभे होते. त्यांना किल्ल्याची माहिती देणारा गाईड पाहिजे होता. किट्टी हे सर्व पाहत होती.
किट्टी लगेच तिथे गेली आणि त्यांना विचारले, आपणाला किल्ला पाहायचा आहे का? त्यातील एक पर्यटक म्हणाला, हो!. किट्टी लगेच म्हणाली, चला माझ्यासोबत
किट्टी त्यांना म्हणाली, की माझे वडीलच या किल्ल्याचे सुरक्षारक्षक आहेत. चला मी तुम्हाला किल्ला दाखवते. पर्यटकांना आनंद झाला, काही सांगितल्याशिवाय किट्टी त्यांची मदत करत होती.
किट्टीने त्यांना केवळ किल्लाच नाही दाखवला तर तिने त्याबाबत सविस्तर माहितीही दिली. पर्यटकांनी विचार देखील केला नव्हता, की एवढ्या लहान वयात किट्टी इतकी चांगली गाईड होऊ शकते.


संपूर्ण किल्ला पाहून झाल्यानंतर जाता जाता किट्टीला काही बक्षिस द्यावे असा पर्यटकांनी विचार केला. परंतु किट्टीने नकार दिला. त्यावर पर्यटक म्हणाले, आम्ही तुला हे आमच्यासाठी जे परिश्रम घेतलेस त्याबद्दल देत आहोत. किट्टी म्हणाली, माझ्या आईवडिलांना जर हे समजले तर ते नाराज होतील.
एका पर्यटकाने सांगितले, की बघ हे खाण्या-पिण्याचे पदार्थ आहेत. यातले तुला जे पाहिजे ते तू इथेच खाऊन घे. म्हणजे तुझ्या आईला काहीच समजणार नाही. किट्टीने त्यांना पूर्णपणे नकार दिला आणि म्हणाली, मी आईपासून काहीच लपवत नाही.
पर्यटक म्हणाले, पण यामुळे काय होणार आहे. किट्टी म्हणाली, जर मी आईला सर्व काही सांगितले नाही तर ती मला कसं समजावून सांगेल, की काय चांगलं आणि काय वाईट आहे ते ? आणि जर तिने तसं सांगितलं नाही तर मी चांगल्या गोष्टी कशा शिकू शकेन ? किट्टीचे हे बोल ऐकून पर्यटक फार खूश झाले व त्यांनी तिला भरपूर आशीर्वाद दिले.





अद्वित



स्वरा



आदिती



आत्मज




आस्था


अलिशा


समीप


प्रणित



कथा

# जाळ्यातून सुटका

एका तलावात एकेकाळी खूप मासे राहायचे. पण त्यांची रोजची सकाळ भीतीने सुरु व्हायची. ती भीती म्हणजे मच्छिमाराचे जाळे. मच्छिमार कोळी रोज सकाळी अगदी न चुकता यायचा आणि पाण्यात जाळे फेकायचा. अनेक मासे त्यात अडकायचे. काहीजण बेसावध असत. ते त्यात सापडायचे. काही जणांना लपायला आणि दुसरीकडे जायला जागाच सापडत नसे. तर काहींना त्या जाळ्याचा धोकाच समजायचा नाही.

त्यांच्यामध्ये एक तरुण मासा होता. तो कायम उत्साही असायचा. त्याला त्या कोळ्याची भीती वाटली नाही. तो सळसळत्या चैतन्याने भरलेले जीवन जगण्यात आणि आनंदी राहण्यात कुशल होता. सगळ्या मोठ्या माशांना त्याचे आश्चर्य वाटायचे. त्यांचा इतक्या वर्षांचा अनुभव आणि त्यातून आलेले शहाणपण देखील त्यांना त्या जाळ्यातून वाचवू शकत नसे. शेवटी त्यांना त्याची उत्सुकता दाबून ठेवणे अशक्य झाले आणि तो

जाळ्यातून कसा सुटतो हे जाणून घ्यायला ते आतुर झाले. एका संध्याकाळी ते सगळे मोठे मासे त्या तरुण माशाकडे गेले आणि त्यांनी त्याला विचारले, हे तरुण पोरा, आम्ही सगळे तुझ्याशी बोलायला आलो आहोत. तो म्हणाला, माझ्याशी ? तुम्हाला माझ्याशी कशाविषयी बोलायचे आहे ?

एक वयस्कर मासा म्हणाला, आम्हाला तुझ्याकडून एका गोष्टीची माहिती हवी आहे. उद्या सकाळी मच्छिमार कोळी पुन्हा येईल. तुला त्याच्या जाळ्यात अडकण्याची भीती वाटत नाही का ? तो तरुण मासा हसला आणि म्हणाला, नाही! मी त्याच्या जाळ्यात कधीच सापडणार नाही. आणखी एक वृध्द मासा म्हणाला, अरे छोट्या, तुझा हा आत्मविश्वास आणि जाळ्यात न अडकण्याच्या यशामागील रहस्य आम्हाला सांगशील का ?

तो म्हणाला, अगदी साधे आहे. जेव्हा कोळी जाळे टाकायला पाण्यात उतरतो तेव्हा मी चटकन त्याच्या पायापाशी जाऊन थांबतो. ती अशी जागा असते, की जिथे त्याचे जाळे पोचत नाही. त्यामुळे मी जाळ्यात सापडत नाही. त्या तरुण माशाचा साधेपणा आणि शहाणपणाचे बोल ऐकून वृध्द मासे चकित झाले.

खरंच, माणसानेदेखील सद्गुरु चरणी नेहमी लीन व्हावे म्हणजे यमाने टाकलेल्या जाळ्यामध्ये तो अडकणार नाही.

अध्यात्मामध्ये जो सद्गुरुच्या चरणी शरण येतो त्याला कधीच काळाचे भय नसते. चौऱ्याऐंशीच्या जन्म मरणाच्या जाळ्यात तो कधीही अडकू शकत नाही. म्हणून संत म्हणतात -

सद्गुरु वाचोनी सापडेना सोय।
धरावे ते पाय आधी आधी।

❒❒❒

## पायी चालणे आरोग्यदायी

प्रात:भ्रमण अर्थात सकाळच्या वेळी मोकळ्या हवेत पायी फिरणे हा एक आरोग्यदायी व्यायाम आहे. एक तासाच्या प्रात:भ्रमणाने मनुष्य दिवसभर फिट राहतो. त्याची कार्यक्षमता वाढते. काम करताना थकवा जाणवत नाही.

प्रात:भ्रमणाने शरीरातील पेशींना सकाळच्या स्वच्छ हवेची प्राप्ती होते. जे लोक प्रात:भ्रमण करत नाहीत, अशा लोकांनी प्रात:भ्रमण केल्यास त्याचे फायदे लक्षात येतील. आजकाल प्रवासाची विविध साधने उपलब्ध झाल्याने पायी चालण्याची सवय कमी झाली आहे. त्यामुळे प्रात:भ्रमणाची आवश्यकता वाढली आहे. ज्या लोकांना सकाळच्या वेळात प्रात:भ्रमणास वेळ मिळत नाही, त्यांनी सायंकाळी पायी चालण्याचा सराव करावा, यात कोणतीही शंका नाही, की सायंकाळचे भ्रमण हे प्रात:भ्रमणापेक्षा अधिक स्वास्थ्यवर्धक आहे.

पायी चालण्याचा व्यायाम एकट्यानेच नव्हे तर समूहानेही करता येऊ शकतो. अशाप्रकारे समूहातून प्रात:भ्रमण अथवा संध्याकाळचे भ्रमण करत असताना चिंतामुक्त रहावे.

पायी चालण्याच्या व्यायामात सातत्य आणि नियमितपणा असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अकारण अथवा आळसामुळे पायी फिरणे बंद करु नये. अशाप्रकारच्या व्यायामात नियमितता राखल्याने तीन गोष्टींचा लाभ होतो. एक म्हणजे आपण कधी आजारी पडणार नाहीत. दुसरे म्हणजे अकाली वृध्दत्वापासून दूर राहाल व तिसरे म्हणजे तणावमुक्त राहाल. तर असा हा आरोग्यवर्धक पायी चालण्याचा व्यायाम.

❒❒❒

# बीड

**तालुके :** बीड, गेवराई, वडवणी, पाटोडा, आष्टी, शिरुर-कासार, अंबाजोगाई, माजलगाव, केज, धारुर, परळी

**सीमा :** उत्तरेस- औरंगाबाद व जालना जिल्हा, पूर्वेस- परभणी व लातूर जिल्हा, दक्षिणेस-उस्मानाबाद जिल्हा, पश्चिमेस अहमदनगर जिल्हा

**नद्या :** गोदावरी, सीना, मांजरा, कुंडलिका, वाण, सिंदफणा, गुणवती, बिंदुसरा, सरस्वती, वाण

**खनिजे :** बांधकामासाठी लागणारा दगड.

**प्रमुख शेतकी उत्पादने :** ज्वारी, बाजरी, गहू, ऊस, गळिताची धान्ये

**धरणे :** गोदावरी नदीवरील मातीचे धरण (माजलगाव); तसेच मांजरा, बिंदुसरा, सिंधफणा व वाण या नद्यांवर धरणे आहेत.

## विशेष माहिती :

❒ पांडव काळात बीडला चंपावती नगर असे संबोधले जाई.

❒ भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी वैजनाथ हे ज्योतिर्लिंग परळी शहरात आहे. हे मंदिर देवगिरीच्या यादवांच्या श्रीकरणाधिप हेमाद्रि याने बांधले.

❒ अंबाजोगाई येथील योगेश्वरी मंदिर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक आहे.

❒ मराठी भाषेतील पहिला ग्रंथ विवेक सिंधू लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज यांची अंबाजोगाई येथे समाधी आहे.

❒ बीड जिल्ह्यात नायगाव येथे महाराष्ट्रातील पहिले मयूर अभयारण्य आहे. येथील अभयारण्यात १० ते १२ हजार मोर आहेत.

❒ मराठवाड्यातील पहिले औष्णिक विद्युत केंद्र ठरण्याचा मान परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रास मिळाला आहे.

❒ बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची संख्या जास्त असल्यामुळे या जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा असे ओळखले जाते.

❒ बीड जिल्ह्यात बालाघाटच्या रांगांत लमाण ही जात आढळते.

❒ बीड-कंकालेश्वर मंदिर, पीर बालाशाह व मन्सुरशाह यांचा दर्गा.

❒ केज- समर्थ रामदास स्वामींचे एक शिष्य उध्दव स्वामी यांची समाधी येथे आहे.

❒ धारुर- डोंगरी किल्ला, हुतात्मा स्मारक, सोने-चांदीची व्यापारी पेठ.

❒ पाटोडा - शंभर मीटर उंचा सौताडा धबधबा.

❒ येळंब - महादेवाचे मंदिर, खुदाबक्ष पिराचा दर्गा.

❒ मांजरसुंभा - जवळच कपीलधार नावाचा धबधबा आहे. तसेच त्याठिकाणी मन्मथ स्वामींची समाधी आहे.

❒ राक्षसभुवन - गोदावरी काठावर आहे. शनीचे मोठे मंदिर आहे.

❒ बीड जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग - सुरत-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग

❒❒❒

# जागतिक वसुंधरा दिन

माय माऊली प्रेमाची तू
वसुंधरा आई
वर्णावी तितुकी थोडी
तुझी ही नवलाई ।।ध्रु।।

निळा जांभळा हिरवा पिवळा, धवल लाल केसरी
सप्तरंगी हा शालू नेसली, भरजरी काठ पदरी
डोंगर दऱ्या सागर सरीता, पर्वत वनराई
सुशोभीत शृंगारीत अशी दिसशी वसुंधरा माई ।।१।।

प्रेमाने अन् आनंदाने राहतात प्राणी
तुझी लेकुरे सारी तू, पुरविशी अन्न पाणी
पशू-पक्षी वनचरे चराचर आणि ही जलचरे
असती तुझ्यापरी उपकारी, कुणा न छळती अपकारे
मिळेल जे तेची खावे, उद्याची फिकीर नाही ।।२।।

असा एक मसीहा माते तुझ्या कुशी जन्मला
स्वर्गाहून सुंदर अती बनविण्यास तुला
विना विश्राम विना आराम प्रयास जीवनभर केला
तुझ्याच छायेमध्ये हा ज्ञानवृक्ष लाविला
फळाफुलांनी आता असा बहरुनी आला
बाग ही सांभाळील पुढे सविंदर माताजी
असे म्हणूनी लोप पावला, तुझ्या कुशीतच आई ।।३।।

कविता : सुरेश तिर्लोटकर

# सामान्य ज्ञान



१) लोकसभेत एकही दिवस न जाणारे पंतप्रधान कोण होते ?

अ) चौधरी चरणसिंग  ब) एच.डी. देवेगौडा  क) इंदिरा गांधी  ड) पं. नेहरु

२) तांबड्या पेशी कोठे असतात ?

अ) हृदयात  ब) जठरात  क) हाडातील पोकळीत  ड) धमणीत

३) एकसंध दिसणारी मुंबई किती बेटांचा समूह आहे ?

अ) ५  ब) ७  क) ६  ड) १०

४) जागतिक पुस्तक दिन कोणाच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो ?

अ) कुसुमाग्रज  ब) शेक्सपिअर  क) पु.ल.देशपांडे  ड) जेम्स पीटरसन

५) भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता ?

अ) हुतूतू  ब) खो-खो  क) हॉकी  ड) क्रिकेट

६) आशियातील भाजीवाला व फळांची सर्वात मोठी घाऊक बाजारपेठ कुठे आहे ?

अ) चेन्नई  ब) कोलकाता  क) नाशिक  ड) वसई

७) भूमिती विज्ञानाचा जन्म कोठे झाला ?

अ) इजिप्त  ब) चीन  क) न्यूयॉर्क  ड) अमेरिका

८) भारतातील पहिले रेडिओ केंद्र कोणत्या शहरात सुरु झाले ?

अ) कोलकाता  ब) गुजरात  क) मुंबई  ड) पुणे

९) पक्ष्यांसाठीचे माळढोक अभयारण्य कोणत्या जिल्ह्यात आहे ?

अ) सातारा  ब) अहमदनगर  क) औरंगाबाद  ड) सोलापूर

१०) संपूर्ण हरदेव बाणी मध्ये एकूण किती पदं आहेत ?

अ) ४००  ब) ३५०  क) ३२५  ड) ३०१

उत्तरे इतरत्र

पक्षीजगत



# जांभळी पाणकोंबडी

**प**र्पल मुऱ्हेन नावाने इंग्रजीत संबोधली जाणारी ही पाणकोंबडीची एक जात. जांभळी पाणकोंबडी हा एक लाजराबुजरा पक्षी असून, तो पाणथळ जागीच आढळतो.

नावाप्रमाणेच गडद जांभळ्या रंगाचा हा पक्षी भारतात सर्वत्र आढळतो. या पाणकोंबडीच्या अनेक प्रजाती अमेरिका, युरोप, आशिया आणि ऑस्ट्रेलियामध्ये आढळतात.

गडद जांभळा रंग, लाल चोच, लाल-काळपट रंगाचे पाय व डोकं असलेली ही पाणकोंबडी दलदलयुक्त भागात, नदीकाठी वा तळ्याकाठी हमखास आढळते. या पाणकोंबडीची उंची साधारणपणे ३२ सेंटीमीटर इतकी असते. कपाळ लाल रंगाचं असल्याने हिचं डोकं लाल टोपी घातल्याप्रमाणे दिसतं. ताठ मान आणि एका विशिष्ट लयीत पाण्यावर तरंगणारी ही जांभळी पाणकोंबडी अत्यंत दिमाखदार दिसते. या कोंबडीला पोहता येत नसले, तरी पाण्यावर असलेल्या विविध वेली आणि पानांवर ती लीलया चालू शकते. तोकड्या पंखामुळे ही पाणकोंबडी फार लांब उडू शकत नाही. यामुळेच कमी पाणी असणाऱ्या ठिकाणी, किनाऱ्यावर व उथळ भागात विशेषत: आढळते. तसेच ती फार लांब अंतरावर स्थलांतर करु शकत नाही.

किडे, अळ्या, बेडूक, गोगलगायी इत्यादी पाणथळ जागी मिळणारे प्राणी हे तिचं मुख्य खाद्य आहे. पाणकोंबडी कायम समूहानेच राहते. एखाद्या पाणथळ ठिकाणी चार-पाच पाणकोंबड्यांचा थवा हमखास दृष्टीस पडतो. नर व मादी पाणकोंबडीत विशेष असा फरक दिसून येत नाही. जांभळ्या पाणकोंबडीचं घरटं पाणवनस्पतीचंच बनलेलं असतं. हे घरटं पाण्याजवळ जमिनीवर असतं. या पाणकोंबडीचा प्रजनन काळ वर्षातून दोनदा असतो. मादी एका वेळी पाच ते बारा फिकट पिवळ्या रंगाची व त्यावर गडद तपकिरी ठिपके असलेली अंडी देते. संशोधकांच्या अभ्यासानुसार, ही अंडी उबवायला आधी जन्मलेली पिल्लंही मदत करतात. नर व मादी दोघं मिळून पिल्लांचं संगोपन करतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव

# महात्मा जोतीराव फुले

सातारा जिल्ह्यात कंटगुण हे एक छोटेसे गाव. येथे गोविंदराव गोऱ्हे व चिमणीबाईंचा संसार सुखाचा चालला होता. दोघेही अशिक्षित पण संस्कारदक्ष होते. गोविंदरावांना दोन मुले. थोरला राजाराम तर धाकटा जोतीराव. जोतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली पुणे येथे झाला. असे म्हणतात, की गोविंदराव गोऱ्हे हे पुण्यातील पेशव्यांना फुले देत असत म्हणून त्यांचे पुढे गोऱ्हेऐवजी फुले आडनाव रुढ झाले. आता त्यांचे पुण्यातच वास्तव्य झाले. जोतीबा अवघा ९ महिन्याचा तान्हुला असताना आई चिमणाबाईंचे निधन झाले. आईच्या वात्सल्यापासून जोतीबा वंचित झाले.

महात्मा जोतीराव फुले बालपणापासूनच बुध्दिमान होते. ते चौकस, धीट आणि निर्भिड होते. त्याकाळी बालविवाह प्रथा रुढ होती त्याप्रमाणे वडील गोविंदरावांनी जोतीबांचे लग्न भांबुर्ड्याच्या गोपाळराव आलेकरांच्या एका सुलक्षणी मुलीशी लावून दिले. तिचे नाव होते सावित्री. या प्रथम विवाहाचे वेळी जोतिबा ६ वर्षाचे तर प्रथम पत्नी सावित्रीसुध्दा ३-४ वर्षाची होती. ती पहिली पत्नी २-३ वर्षानंतर मृत्यूमुखी पडली. तेव्हा लगेच जोतीरावांचे दुसरे लग्न करण्यापेक्षा त्यांना पुढे शिकू द्यावे असा विचार वडिलांचा झाला. पुढे जातीभेदाच्या भिंती समाजकंटकांनी उभ्या केल्या आणि त्यांना आपले शिक्षण मध्येच बंद करावे लागले. त्यांनी आता वडिलांच्या फुले विक्री व्यवसायात लक्ष घातले. ते १४ वर्षांचे झाले नि त्यांचे दुसरे लग्न सातारा जिल्ह्यातील खंडेराव नेवासे-पाटील यांच्या मुलीशी म्हणजे सावित्रीशी पार पडले. त्याच पुढे सावित्रीबाई फुले-विद्येची क्रांतिजोती, आद्य मुख्याध्यापिका व आद्यशिक्षिका म्हणून नावारुपास आल्या.

माणसाला श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरवणाऱ्या जातीभेदाचा नायनाट होत नाही तोवर देशाची उन्नती शक्यच नाही हे जोतीरावांना उमगले. मानवता धर्माप्रमाणे आपले वर्तन चालले काय? असा रोखठोक सवाल त्यांनी तत्कालीन धर्ममार्तंडांना विचारला, “वामन का घाली बळी रसातळी। प्रश्न जोती माळी। करी भटां।। ५।।”

मुलांप्रमाणे मुलींना व सर्वच जातीधर्माच्या बालकांना प्राथमिक शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. असे त्यांना ध्यानी, मनी व स्वप्नीही वाटू लागले होते. त्यांनी प्रथम स्वतःच्या निरक्षर पत्नीला, सावित्रीबाईंना स्वतः अक्षरे गिरवून शिकविले आणि शिक्षिकेची जबाबदारी सोपविली. सन १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यातील भिडे पाटलांच्या वाड्यात सुरु केली. सनातनी समाजकंटकांनी कडाडून विरोधी कारवाया केल्या. त्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी अजिबात दाद दिली नाही. जोतीराव तेली, कुणबी, साळी, माळी, कुंभार,

लोहार, सोनार तसेच मांग, महार, चांभार, मादगी, भंगी इ. वस्तीत जाऊन शिक्षणाची गोडी निर्माण करु लागले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊ लागले. त्यांनी दलित, अस्पृश्यांच्या मुलामुलींसाठी पुण्यातील भोकरवाडी येथे एक व त्यानंतर बऱ्याच ठिकाणी शाळा व अनाथाश्रम सुरु केले. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे वैतागलेल्या दलित स्त्रिया-पुरुष-मुलांना आपला स्वतःचा पाण्याचा हौद खुला करुन पाणी भरु दिले.

सन १८६४ मध्ये त्यांनी एका बालविधवेचा पुनर्विवाह रचला. तो सत्यशोधक समाजोक्त पूजा विधीनुसार प्रथम पुनर्विवाह म.फुले रचित मंगलाष्टकांद्वारे पार पडला. त्याचे शेवटचे ५वे मंगलपद असे आहे –

आभार बहुमानिजे आपुलिया, माता पित्यांचे सदा।
मित्रांचे तुमच्या तसेच असती, जे इष्ट त्यांचे वंदा।
वृध्दा पंगु सहाय्य द्या मुली-मुलां, विद्या तया शिकवा।
हर्षे वृष्टी करा फुलांची अवघे, टाळी आता वाजवा।
शुभमंगल सावधान।।५।।

त्यानंतर त्यांनी दि. २४ सप्टेंबर१८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. काशीबाई नामक ब्राह्मण विधवेच्या मुलांस म.फुले दांपत्याने दत्तक घेतले. हाच दत्तक मुलगा शांताराम आजारी पडून मृत्यू पावला. परत तिच्या दुसऱ्या मुलाला, यशवंतरावाला दत्तक घेतले आणि निपुत्रिक असल्याचे दुःख विसरुन गेले. त्याचे ससाणे या कार्यकर्त्याच्या राधा नामक मुलीशी लग्न लावून दिले. गिरणी कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्याही समस्या सोडविण्यात जोतीरावांचा सिंहाचा वाटा होता. म्हणून त्या संघटनांच्यावतीने त्यांचा जाहिर सत्कार करुन दि. १९ मे १८८८ रोजी 'महात्मा' ही बहुमानाची पदवी त्यांना बहाल करण्यात आली. त्यांची ग्रंथसंपदाही पुष्कळ आहे. ती दत्तक पुत्र यशवंतरावजी फुलेंनी आजवर जतन करुन ठेवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुलेंना गुरुस्थानी मानले तर बडोद्याचे श्रीमंत राजे सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांना भारताचे बुकर-टी वाशिंग्टन अशी उपाधी देऊन गौरविले होते. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहूजी महाराज हे त्यांच्या सत्यशोधक विचारांचे प्रचारक व प्रसारक ठरले. म. फुलेंनी जगाला एक जीवनसंजिवनी मंत्र दिला

विद्येविना मति गेली। मतिविना नीति गेली।
नीतिविना गति गेली। गतिविना वित्त गेले।
वित्ता विना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।

महात्मा फुले दि. २८ नोव्हेंबर १८९० रोजी अनंतात विलीन झाले.

❒ संग्राहक : श्रीकृष्ण निकोडे
(गडचिरोली)

गुरु आणि निराकार प्रभु-परमात्मा दोन नसून एकच आहे. गुरुच्या देहाकडे पाहू नका. हा देह तुमचा गुरु नाहीये. देह तर नश्वर आहे; परंतु गुरु अविनाशी असतो. ज्ञान हाच आपला गुरु आहे. निराकार-प्रभुचं ज्ञान गुरुकडून प्राप्त होतं. गुरु जे इच्छितो तेच होत असतं आणि गुरु निराकार-प्रभुच्या आदेशाव्यतिरिक्त काहीच करत नाही. म्हणूनच मी तुम्हाला सांगतो, तुम्ही या निराकार ईश्वरावर प्रेम करा.

**युगपुरुष बाबा अवतारसिंहजी**

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) अ
२) क
३) ब
४) ब
५) क
६) अ
७) अ
८) क
९) ड
१०) ड

## शब्दकोडे १६५

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ए | क | ता | | मो | | भू |
| क | | ज | य | सं | हि | ता |
| स | क्ष | म | | बी | | न |
| ष्ट | | हा | | | नं | |
| | ला | ल | ब | हा | दू | र |
| | तू | | र्लि | | र | |
| व | र | दा | न | | बा | पू |
| ढू | | स | | थ | र | |

।। तू ही निरंकार ।।

**ना चिंता हो, ना भय हो...**
**केवळ "सद्गुरू माता सविंदर हरदेवजी महाराज" की जय हो....!**



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

# महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

